घड्याळ म्हंटल की..
**विठ्ठल वॉच**
नामवंत कंपन्यांची घड्याळे
मिळतील विक्री व दुरूस्ती


सुधाकर कॉम्पलेक्स,नगरपलिकेसमोर
मायणी रोड,विटा (जि.सांगली)
८२६२८३५३९१-९४२१२२१६३०

# प्रीतिसंगम

www.pritisangam.com
सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर

श्री चैतन्य टेस्ट ट्युब बेबी सेंटर
तुमच्या मातृत्वाच्या स्वप्नांना आमची साथ..!
आपले आई-बाबा होण्याचे स्वप्न आता पूर्ण होईल!

६०००+
8484-86-1900
शाखा बारामती | सातारा | अहिल्या नगर

वर्ष २९ वे | अंक ११२ | पाने ६ | गुरुवार | दि. २१ ऑगस्ट २०२५ | किंमत २ रूपये | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५





पाटण येथे मुळगाव रस्ता, स्मशानभूमी परिसर, नवीन स्टॅण्ड परिसरात पाणी आल्याने अनेक घरे, दुकाने पाण्याखाली गेली आहेत. (छाया-एस.मोहिते) तर तीसऱ्या छायाचित्रात प्रीतिसंगमावरील कृष्णामाई मंदीरात पाणी शिरल्याचे दिसत आहे. (छाया-अस्लम मुल्ला)

# पाऊस मंदावला, पूरस्थिती कायम

## कोयनेत १०१.४६ टीएमसी पाणीसाठा, ९९००० क्युसेक्स विसर्ग: कृष्णा नदीवरील अनेक मंदीरे पाण्याखाली

***पाटण/एस.मोहिते:-***

कोयना धरणाच्या छत्रपती शिवाजी महाराज जलाशय पाणलोट क्षेत्रातील पाऊस बुधवारी दिवसभर थोडा मंदावला असला तरी धरणातील पाण्याची आवक १,२१,७०० वरुन १,११,११६ वर आली आहे. धरणातील शिल्लक राहिलेली पाण्याची साठवण क्षमता संपुष्टात आली असून केवळ ३.५० टिएमसी शिल्लक राहिलेली आहे. साठवण क्षमतेपेक्षा आवक मोठी असल्याने कोयना धरणाचे वरील सहा वक्र दरवाजे १३ फुटांवर स्थिर ठेवलेले आहेत. यामुळे नदीपात्रात ९५,३००क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे. यामुळे अद्याप पाटण तालुक्यातील अनेक ठिकाणची पूरपरिस्थिती कायम आहे. पावसाने काल बुधवारी चांगलीच उसंत दिल्याने कोयनेच्या उपनद्यांचे पाणी ओसरले आहे. तरीदेखील नदीकाठावरील गावांसह कराड, सांगली या शहरांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. तसेच अगदीच नदीकाठावर असणाऱ्या नागरिकांनी सुरक्षितता बाळगावी असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

या पूरपरिस्थितीमुळे हेळवाक, नेरळे मुळगाव हे पुल दुसऱ्या दिवशी पाण्याखालीच राहिल्याने नदी पलीकडील गावे वाहतूकीसाठी संपर्कहिन आहेत. दरम्यान पाटण तालुक्यातील तारळी, उत्तर मांड, गुरेघर, वांग मराठवाडी, चिटेघर ही धरणे पूर्ण क्षमतेने भरले असून सर्वच धरणातून नदीपात्रात विसर्ग सुरू आहे. यामुळे पाटण तालुक्यातील सर्वच नद्या दुथड्या भरून वाहत आहेत. हेळवाक बाजार पेठ व पाटण शहरातील नवीन एस.टी. स्टॅण्ड परिसरात, कळके चाळ मुळगाव रस्ता, स्मशानभूमी येथे पूराचे पाणी जैसे थे आहे.

मागील २४ तासात म्हणजे मंगळवारी सायंकाळी ५ वा ते बुधवारी सायंकाळी ५ वा. पर्यंत कोयना- ३०३ मि.मी (एकूण- ३९६१) नवजा- ४३१ मि.मी (एकुण- ४८६६) महाबळेश्वर- ३६१ मि.मी (एकुण- ४५६१) एवढी नोंद झाली आहे. पाण्याचा वाहत्या प्रवाहात नागरिकांनी नदीपात्रात उतरण्याचा प्रयत्न करु नये. पावसाचे पुढील प्रमाण पहाता आवश्यकता वाटल्यास धरणातून नदीपात्रातील पाण्याचा विसर्ग कमी - जास्त केला जाईल असे धरण व्यवस्थापना कडून सांगण्यात आले आहे. यासह नदीकाठावरील गावांसह कराड, सांगली या शहरांना सतर्कतेचा इशारा कायम ठेवण्यात आला आहे.



### जिल्ह्यात १२९ कुटुंबांचे स्थलांतर

साताऱ्यात अनेक ठिकाणी पावसाचा जोर कायम असल्याने आपत्ती व्यवस्थापनाचे प्रश्न निर्माण झाले आहे सातारा जिल्ह्यातील१२९ कुटुंबातील ३६१ नागरिकांचे तात्पुरते स्थलांतर करण्यात आले आहे. पाटण तालुक्यातील पाटण शहरात १३ कुटुंबातील ४५, हेळवाक येथील पाच कुटुंबातील १७, नावडी औंध वस्ती येथील सात कुटुंबातील पंधरा, कराड तालुक्यातील कराड शहर पत्राचाळ पाटण कॉलनी कोयना दूध कॉलनी रुक्मिणी नगर येथील सहा कुटुंबातील २४, महाबळेश्वर तालुक्यातील येरणे बुद्रुक येथील आठ कुटुंबातील १८, वाई शहरातील ४० कुटुंबातील १३५, सातारा तालुक्यातील भैरवगड येथील ३० कुटुंबातील ६५, मोरेवाडी येथील वीस कुटुंबातील ४२ अशा ३६१ नागरिकांचे स्थलांतर प्रक्रिया राबवण्यात आली आहे.

### सातारा जिल्ह्यात सरासरी ३६.३ मि.मी. पाऊस

जिल्ह्यात सकाळी १० वाजेपर्यंत झालेल्या पावसाची तालुकानिहाय माहिती आणि कंसात आतापर्यंत झालेल्या एकूण पावसाची आकडेवारी मि. मी. मध्ये पुढीलप्रमाणे आहे. सातारा- ४५.२ (५२२.२) मि. मी., जावळी- ३९.४ (१२०७.० ) मि.मी., पाटण-३४.५ (८०४.९ ) - (४७९.१) मि.मी., कराड-३३.० (४७९.१) मि.मी., कोरेगाव-४५.४ (३६४.८) मि.मी., खटाव-१९.६ (२६८.२) मि.मी., माण- ९.१ (२४१.५) मि.मी., फलटण- १२.२ (१८१.४) मि.मी., खंडाळा- २१.८ (२८२.६) मि.मी., वाई- ४६.० (६०९.०) मि.मी., महाबळेश्वर-१५६.४ (२६३१.४ ) मि.मी. पावसाची नोंद झाली आहे.



# आंबेनळी घाटात दरड कोसळली

***प्रतापगड/प्रतिनिधी:-***

महाबळेश्वर-कुभरोशी मार्गावरील आंबेनळी घाटात आज (बुधवार) पहाटे मोठ्या प्रमाणात दरड कोसळल्याने काही काळ वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. मेटतलेच्या वर कावळ्याची मोरी या ठिकाणी मोठ्या प्रमाणात माती, दगड, झाडे व झुडपे रस्त्यावर पडल्यामुळे घाटमार्ग बंद पडला होता. प्रवासी आणि स्थानिक नागरिकांना या दरम्यान मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागला.

दरड कोसळल्याची माहिती मिळताच महसूल विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. सकाळपासून युद्धपातळीवर जेसीबी आणि अन्य यंत्रसामग्रीच्या साहाय्याने दरड हटवण्याचे काम सुरू करण्यात आले. अखेर काही तासांच्या प्रयत्नानंतर रस्ता मोकळा करण्यात यश आले असून दुपारपर्यंत वाहतूक सुरळीत झाली.

या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र काही तास वाहतूक विस्कळीत झाल्याने प्रवासी, स्थानिक नागरिक आणि पर्यटकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला.

# पालकमंत्र्यांच्या हस्ते कोयना जलाशयात जलपूजन

***सातारा/प्रतिनिधी:-***

कोयना धरणात ९६.३८ टक्के टी.एम.सी. पाणीसाठा झाला आहे. या धरणातील जलाशयातील जलपूजन पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी केले.

कोयना धरणस्थळी झालेल्या जलपुजन कार्यक्रमास जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता अभय काटकर, प्रांताधिकारी सोपान टोम्पे, तहसीलदार अनंत गुरव, कार्यकारी अभियंता महेश रासनकर आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. देसाई यांनी कोयना धरणातील जलाचे विधिवत पूजन करून ओटी भरण केले. यावेळी ते म्हणाले, कोयना धरणास महाराष्ट्राची भाग्यरेखा म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्राच्या विशेषतः पश्चिम महाराष्ट्राच्या भरभराटीमध्ये, संपन्नतेमध्ये या धरणाचा फार मोलाचा वाटा आहे. आज परंपरेने रितीरिवाजाप्रमाणे प्रशासनास घेऊन जलपूजन करत असताना सध्या धरणात १०१ टीएमसी पाणीसाठा आहे. पाण्याचा ९९००० क्युसेक्सने विसर्गही सुरू आहे. कोयना धरण



हे १०० टीएमसीच्यावर भरल्याने कोयनामाईची अशीच कृपा संपूर्ण महाराष्ट्रावर व्हावी, सुजलाम सुफलाम महाराष्ट्र व्हावा, पाण्याची टंचाई भासू नये, मुबलक वीज निर्मिती व्हावी, यासाठी कोयनामाईचे पूजन करण्यात आल्याची भावनाही पालकमंत्री देसाई यांनी व्यक्त केली.

# कराडकरांना कोणती अडचणी येऊ देणार नाही

## आ.डॉ.अतुल भोसले; प्रीतिसंगम घाट परिसर बंद करण्याच्या सूचना

***कराड/प्रतिनिधी:-***

कोयना धरणातून मोठ्या प्रमाणात पाणी सोडल्याने कराडला पूर परिस्थिती गंभीर होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर शहर परिसरातील पूरग्रस्त भागातील नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात येणार असून, त्यांना कोणत्याही प्रकारची अडचणी येऊ देणार नसल्याचे आश्वासन आमदार डॉ. अतुल भोसले यांनी दिले.

कृष्णा कोयनेच्या पाणीपातळीत वाढ झाल्याने कृष्णामाई मंदिरापासून पाणी वर आले आहे. त्यामुळे संभाव्य पूर परिस्थिती निर्माण झाली असून, आमदार अतुल भोसले यांनी सदर परिसरात अधिकाऱ्यांसह भेट देऊन पाहणी केली. याप्रसंगी माध्यमांशी ते बोलत होते.

आमदार भोसले म्हणाले, कराड शहर परिसरातील ज्या ठिकाणी पुराचा सर्वात जास्त धोका आहे, अशा कृष्णा घाट परिसर, प्रीतिसंगम बाग, स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेबांचे स्मृतिस्थळ, कुंभार समाजाचे मूर्ती निर्मिती पत्र्याचे शेड, साई मंदिर परिसर व पाटण कॉलनी अशा ठिकाणी भेट देऊन पाहणी केली असून, तेथील नागरिकांशी संवाद साधला आहे.

पान ३ वर



### प्रीतिसंगम घाट परिसर बंद

नदीच्या पाणीपातळीत मोठी वाढ होत असल्याने प्रीतिसंगम घाट परिसर बंद करण्यासंदर्भात प्रशासनाशी चर्चा करण्यात आली आहे. प्रशासनानेही या ठिकाणी नागरिकांना प्रतिबंध करण्यात यावा, अशी सूचना मांडली आहे. हौशी युवक, नागरिक पाणी पाहण्यासाठी आल्यास पाय घसरून, अथवा वाहन वाहून जाऊन दुर्घटना होण्याची शक्यता असल्याने प्रीतिसंगम घाट परिसर नागरिकांसाठी बंद करण्यात येणार असल्याचे आमदार भोसले यांनी सांगितले.

# भूविकास बँकेजवळील अतिक्रमणांवर पालिकेचा हातोडा

## बुधवारी सायंकाळी धडक मोहीम; अनेक हातगाडी, खोकी, दुकाने काढली

***कराड/प्रतिनिधी:-***


येथील नगरपालिकेच्या बांधकाम आणि आरोग्य विभागाने शहरात बुधवारी सायंकाळी अतिक्रमण हटाव मोहीम राबवली. यामध्ये प्रामुख्याने बस स्थानक परिसरातील सिग्नलवर भूविकास बँक परिसरातील अतिक्रमणांवर हातोडा टाकण्यात आला. यामध्ये अनेक हातगाडे, खोकी, दुकाने हटवण्यात आली असून, या परिसराने मोकळा श्वास घेतला आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून शहरातील बस स्थानक परिसरात मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे वाढली होती. याबाबत संबंधितांना नगरपालिका प्रशासनाने अनेकदा नोटिसा बजावून अतिक्रमणे स्वतःहून काढून घेण्याचे आवाहन केले होते. मात्र, त्याकडे संबंधित व्यावसायिकांनी दुर्लक्ष केले. या अतिक्रमणांमुळे वाहतुकीला मोठ्या प्रमाणात अडथळा होईल, अशा पद्धतीने व्यवसायिकांनी ही दुकाने, हातगाडे, खोकी थाटली होती. बस स्थानकाच्या आतील बाजूसही शनी मंदिराजवळ मोठ्या प्रमाणात हातगाडे, लावण्यात आली होती.

अखेर नगरपालिका प्रशासनाने बांधकाम व आरोग्य विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मदतीने बुधवारी सायंकाळी अतिक्रमण हटाव मोहीम राबवली.

पान ३ वर


पालकमंत्र्याचा आदेश कराड पालिकेने बासनात गुंडाळला
न्यायालयाच्या आदेशानाही..


### रिक्षा थांब्यांवरही कारवाई व्हावी

बस स्थानक परिसरातील कर्मवीर चौक सिग्नल, बस स्थानकाचे मुख्य गेट, विजय दिवस चौक, वेणूताई चव्हाण उपजिल्हा रुग्णालय, कृष्णा नाका याठिकाणी असलेल्या रिक्षा गेटवर परवाण्यापेक्षा जास्त रिक्षा थांबत असून, वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे अशा रिक्षा थांबल्यानंतरही नगरपालिका प्रशासन व वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# संपादकीय

## निवडणुक आयोगाचे मौन

राज्यात मुसळधार पावसाचा जोर असून सध्या पाऊस कमी झाला असला तरी शेतकर्यांच्या पिकांचे नुकसान झाले आहे, हे विसरता कामा नये. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, पुढील काही दिवस पावसाचा जोर कायम राहणार आहे. अतिवृष्टीमुळे निर्माण होणाऱ्या पूरस्थितीमुळे राज्यात शेतपीक, फळबागांचे नुकसान झाल्यास संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी नुकसानीचे पंचनामे तातडीने करून त्याचा अहवाल विनाविलंब सादर करावा, अशी सूचना मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद पाटील यांनी नुकतीच केली आहे. भारतीय हवामान विभागाने विदर्भ, मराठवाडा, कोकण या भागात पुढील चार दिवस अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. सातारा जिल्ह्यालाही ऑरेंज अलर्ट दिला आहे. त्यामुळे प्रशासनाने नागरिकांना तातडीने मदत उपलब्ध करून देण्यासाठी सतर्क राहावे. शासन नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या घटकांना त्वरित मदत व दिलासा मिळावा, यासाठी प्रशासनाने अतिवृष्टी, पूरबाधितांचे तातडीने पंचनामे करावेत. या नुकसानीचा अहवाल संबंधित विभागीय आयुक्तांमार्फत शासनास सादर करावा.

राज्याच्या विविध भागांत सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा मोठा फटका शेतकर्यांना बसला असून, चौदा लाख एकर क्षेत्रातील पिके बाधित झाली आहेत. मागील चार दिवसांपासून मुंबईत मोसमी पाऊस सक्रिय झाला. शुक्रवारी सकाळी साडेआठ ते शनिवारी सकाळी साडेआठ दरम्यानच्या २४ तासांत मुंबई शहरात पाच वर्षांतील सर्वाधिक म्हणजेच २४४.७ मि.मी. पावसाची नोंद झाली. या पावसाने मुंबई पुन्हा तुंबली. महापालिकेचे प्रयत्न उघड्यावर पडले. दोन दिवस मुंबई नगरीमध्ये बाका प्रसंग आला. लोकल रेल्वे थांबल्या, बस वाहतूक थांबली एवढेच काय शाळाही बंद ठेवाव्या लागल्या. सरकारी आणि खासगी संस्था, शाळांना सुटी देण्याची वेळ आली. संपूर्ण शहरी जनजीवन कोलमडले. सर्वसामान्य माणसाचे मोठे हाल झाले. मुंबईसह संपूर्ण राज्यात पावसाने ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीपासून विश्रांती घेतली होती. त्यानंतर गेल्या शुक्रवारपासून राज्यात पुन्हा पाऊस सक्रिय झाला. संततधार पावसाने अनेकांची घरे जमीनदोस्त झाली तर शेतकर्यांच्या पिकांचे नुकसान झाले आहे.

मुंबईला पाणीपुरवठा करणार्या धरणांच्या पाणलोट क्षेत्रात आता पाणीसाठा ९० टक्क्यांवर पोहोचला. ठाणे जिल्ह्याची तहान भागवणारे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे बारवी धरण ओसंडून वाहू लागल्यामुळे या जिल्ह्याची पाणी चिंता मिटली. राज्यात सोमवारी एकाच दिवसात एक हजाराहून अधिक गावांत अतिवृष्टी झाली आहे. त्यात अनेकांचा बळी गेला. मराठवाड्याच्या अनेक भागांत पुरस्थितीत निर्माण झाली आहे. या पावसाळ्यात अतिवृष्टीचा तडाखा विदर्भालाही बसला आहे. राज्य आपत्ती प्रतिसाद दल (एसडीआरए) व लष्कराच्या मदतीने बचावकार्य सुरू असून, पथकाने २३९ नागरिकांची सुटका केली. पश्चिम महाराष्ट्रातील कोयना, चांदोली, राधानगरी ही धरणे भरली असून धरण क्षेत्रात अतिवृष्टी झाली. पंचगंगा यंदाच्या हंगामात पाचव्यांदा पात्राबाहेर पडली असून ती इशारा पातळीकडे जात आहे. कोयना धरणातून ९१ हजार क्युसेकचा विसर्ग सुरू झाला असून, राधानगरी धरणाचे सर्व दरवाजे उघडले आहेत. याचा अर्थ, सर्वत्र पुराचे संकट असून निसर्गापुढे माणसाचे काही चालत नाही असे म्हणून हातावर हात धरून बसता येणार नाही. सातत्याने अतिवृष्टी होते त्यावेळी धरणांतून किती पाणी सोडायचे, याचे विचारपूर्वक नियोजन करावे लागते. कारण कर्नाटकातील अलमट्टी धरणाची ऊंची वाढवायचा हट्ट कर्नाटक सरकार सोडत नाही. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रात महापुराची परिस्थिती उद्भवते.


अरबी समुद्रात समुद्रसपाटीला समांतर कमी दाबाचा पट्टा सक्रिय झाल्याने मुंबईपासून सिंधुदुर्गपर्यंत उंच ढगांची निर्मिती होत आहे. म्हणूनच कमी वेळेत जास्त पाऊस पडत आहे. घाटमाथ्यावरही हेच चित्र आहे. बंगालच्या उपसागरात तीव्र कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले असून, त्याची तीव्रता वाढून त्याचे रूपांतर डिप्रेशनमध्ये होणार आहे. मराठवाड्यात सर्वसाधारणपणे १५ ते २० मि.मी. पाऊस योग्य मानला जातो; मात्र गेल्या काही दिवसांच्या आकडेवारीनुसार, अनेक भागांत तेथे ६० मि.मी. पावसाची नोंद झाली. काही ठिकाणी तर पाऊस १०० मि.मी.च्याही पुढे गेला. राज्यातील अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर सरकारने महसूल, आपत्कालीन व पोलीस यंत्रणेला सतर्कतेचे आणि मदतकार्यात सहभागी होण्याचे तसेच पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. पंचनामे लवकरात लवकर होऊन शेतकर्यांना तत्काळ मदत मिळण्याची गरज आहे. राज्यात २५ ऑगस्टपर्यंत पुन्हा अतिवृष्टीची शक्यता हवामान खात्याने वर्तवली असून, १६ जिल्ह्यांत रेड अलर्ट, तर काही जिल्ह्यांत ऑरेंज अलर्ट दिला आहे.

राज्यात गत वर्षी ऑक्टोबरमध्ये मान्सूनोत्तर पावसाने काढणीस आलेल्या खरीप पिकांचे तसेच भाजीपाला, फळभाज्यांसह फळबागांचे प्रचंड नुकसान झाले. पण शासकीय यंत्रणांकडून पीक नुकसानीचे पंचनामे होत नसल्याचे व काही ठिकाणी त्यांची गती संथ असल्याचे दिसून आले. अनेकांना सर्व्हर डाऊनचा फटका बसत असल्याने शेतकर्यांची कोंडी झाली होती. पीक नुकसानीची दाद नेमकी मागायची कोणाकडे ? असा प्रश्न शेतकर्यास पडला आहे. प्रशासकीय यंत्रणा निवडणुकीच्या कामात असल्याने बर्याच ठिकाणी पंचनाम्यांबाबत अधिकारी हात वर करत होते. काढणी केलेल्या शेतातील पिकांच्या नुकसानीच्या पंचनाम्यांबाबत टाळाटाळ, पिकांचे नुकसान तर होत आहे; पण कोणाकडूनच पंचनामा नाही, काही भागांत विमा कंपन्यांना फोन केल्यास प्रतिसादच मिळत नाही, सर्व्हर डाऊनमुळे ॲपला प्रतिसाद नाही यासारख्या अनेक तक्रारींचे निरसन झालेले नाही. घरांचे नुकसान, माणसे व पशुधनाचे मृत्यू याबाबत नुकसानीच्या भरपाईचे अधिकार जिल्हाधिकार्यांना दिले असून त्यामुळे या कामाला गती येईल. घरांचे नुकसान झालेल्यांना तात्पुरते निवारे उभारण्याचे तसेच आपद्ग्रस्तांना जेवण आणि पिण्याचे स्वच्छ पाणी पुरवण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

ओल्या दुष्काळामुळे अनेक भागांत शेती पाण्याखाली गेली, तर काही ठिकाणी पावसाच्या अभावामुळे पिके करपून गेली, अशी अवस्था महाराष्ट्रात निर्माण झाली आहे. गेल्या काही महिन्यांत शेतकर्यांच्या आत्महत्या वाढल्या आहेत. बेभरवशाच्या निसर्गामुळे जगायचे तरी कसे, असा प्रश्न बळीराजाला पडला आहे. शेतकरी आणि सामान्य जनतेची काळजी घेतली गेली पाहिजे. प्रशासनाने खबरदारी बाळगून संकटग्रस्त भागात मदत आणि बचावकार्य राबवताना तत्काळ उपाययोजनाही केल्या पाहिजेत. जीवित आणि वित्तहानी टाळण्याला प्राधान्य दिले पाहिजे. नैसर्गिक आपत्तीत नागरिकांचा मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबीयांना तत्काळ मदत मिळावी, तसेच जखमी नागरिकांना मदत मिळावी, यासाठी राज्यातील पूरस्थिती मानवनिर्मित आहे, असा टोला शिवसेना ठाकरे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिला आहे. विरोधी पक्षांच्या नेत्यांनी केलेल्या सचानेचे पालन राज्य सरकारने करावे, असे वाटते. म्हणजे, अतिवृष्टीला सामोरे जाता येईल, असे वाटते.

# नैतिकतेच्या विधेयकावर बहुरंगी तमाशा

लोकशाही हा संवादाचा उत्सव असतो, असे आपण सगळेच शिकलेलो आहोत. पण भारतात काही गोष्टी शिकल्यापेक्षा पाहणे आणि सोसणे यावर जास्त भर दिला जातो. आणि त्यात जर विषय नैतिकतेचा असेल, तर मग काय विचारता... साक्षात संसदच जणू कोणते तरी बिनतिकीट तमाशा किंवा डब्लूडब्लूईचा आखाडा बनतो ! संसदेच्या सभागृहात नैतिकतेच्या विधेयकावर सत्ताधारी आणि विरोधकांचा बहुरंगी बहुढंगी तमाशा नुकताच पाहायला मिळाला. देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी नुकतीच लोकसभेत तीन विधेयके मांडली. त्यातील एक विशेष विधेयक होते, कोणत्याही पंतप्रधान, मुख्यमंत्री किंवा मंत्र्याने जर ३० दिवस सलग तुरुंगात घालवले, तर त्यांना पदावरून हटवता येईल ! हो, अगदी खरं वाचलंत. पण हे ऐकून विरोधकांचा संताप एवढा वाढला की, एका खासदाराने तर विधेयकाची कॉपी फाडून गृहमंत्र्यांच्या दिशेने भिरकावली. हे पाहून असे वाटते की, विरोधकांकडून पावसाळी अधिवेशनात फाईलांचा पेपर शॉवर होणं हे म्हणजे संसदेचं हवामान बदलल्याची खूणगाठ आहे.




यावेळी विरोधी पक्षांनी जोरजोरात घोषणा दिल्या. लोकशाही बचाओ, तानाशाही हटाओ, आणि शेवटी कॉपी फाडो ! विरोधकांनी त्यांचा निषेध नोंदवण्यासाठी नवी शक्कल लढवली. विरोधक वेलमध्ये उतरले. इतके की आता वेलमधून बाहेर येणं हेच सगळ्यांचं नवं संकल्प ठरणार की काय ! आपल्याकडे वेदांमध्ये वेल म्हणजे ज्ञानाचा प्रकाश असतो. पण इथे वेल म्हणजे तोंडाचा फडशा आणि माइक तोडण्याची स्पर्धा दिसून आली!

देशाचे गृहमंत्री अमित शाहजींनी भाषणात नैतिकतेवर भर दिला. ते बाणेदारपणे म्हणाले, मी... मी जेलमध्ये गेलो होतो तेव्हा राजीनामा दिला होता, असं त्यांनी सांगितलं. अर्थात, त्यांनी राजीनामा दिला हे खरं असलं तरी तो केव्हा घेतला हे सांगताना त्यांनी आपल्या घड्याळाकडेही पाहिलं नाही. कारण काही काही नैतिकता ही सेल्फ मोमेंट असते – दाखवायची, पण जपून! अमित शाह यांनी जेलमध्ये गेल्यानंतर राजीनामा दिला होता, हे ऐकून विरोधकांना हसू आवरेनासे झाले. अमित शाह यांनी रागाने विरोधकांकडे पाहत म्हटले की, आम्ही निर्लज्ज नाही. असं सांगताना त्यांनी अनेक खासदारांच्या चेहऱ्याकडे पाहिलं आणि काही विरोधक तर तोंडावर हात ठेवून हसले.



**अशोक सुतार**

**कृष्णाकाठ...**

अमित शाहजींनी हे विधेयक संसदेच्या संयुक्त समितीकडे (जेपीसी ) पाठवण्याचा प्रस्ताव ठेवला. आता ही समिती म्हणजे काय, तर २१ लोकांनी मिळून ठरवायचं की, सगळं काही बरोबर आहे का ? म्हणजे २१ लोकांनी ७० कोटी मतदारांचं प्रतिनिधित्व करायचं... विशेष हे की, सत्ताधारी सरकारला त्यांनी मांडलेले मुद्दे किंवा विधेयक त्यांच्या समितीला आक्षेपार्ह कधीच वाटत नाही. राक्षसी बहुमताचा तो एकमेव राजकीय फायदा असतो, असे काहीजण म्हणतील, पण हा निव्वळ योगायोग असतो म्हणे ! जरा पाहू कमिटी म्हणजेच जेपीसी या नावाचं सरकारने नवं सरकारी सर्जन सुरू केलंय. ती समिती जेव्हा काम करायला लागेल तेव्हा विधेयकाला बहुधा नैतिकतेच्या ऐवजी ऐतिहासिकतेची गारंटी मिळेल. कारण विद्यमान केंद्र सरकार कोणतेही विधेयक मंजूर झाल्यावर ते ऐतिहासिक आहे, अशी हाकाटी पिटत असते.

विरोधकांनी गोंधळ घालतानाच गृहमंत्र्यांचा माइक मोडण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी भाजप खासदार रणवीर बिट्टू, किरेन रिजिजू वगैरे मंडळींनी हातचलाखीने तो माइक विरोधकांच्या हातातून वाचवला. ही कारवाई पाहून वाटलं, की संसदेच्या कामकाजात आता माइक बचाव फोर्स स्थापन होणार तर नाही ना ?

### नैतिकता आहे तरी कुठे ?

अमित शाह म्हणतात, नैतिकतेचे मूल्य वाढले पाहिजे. पण प्रश्न असा आहे की, ही नैतिकता केवळ विरोधकांसाठीच का ? आणि ती वाढवायची तर मग संसदेत कागदं फाडणं, माइक तोडणं, वेलमध्ये उतरून घोषणाबाजी करणं हे सगळं नैतिकतेच्या नवीन पाठ्यपुस्तकात कोणत्या धड्यात येतं ? एकंदरीत, संसदेचा कारभार पाहता लोकांनी आता नेटफ्लिक्स सोडून लोकसभा टीव्हीकडे वळावं लागेल. कारण इथे पात्रं खरी आहेत, पण पटकथा फिल्मी आहे. लोकसभेच्या कामकाजात आता मनोरंजन, नाटक, फिल्मी संवाद आणि तमाशा (फार्स ) यांचा समावेश झाला आहे. त्यामुळे बेरोजगारी, महागाईच्या कचाट्यात सापडलेल्या जनतेचे घडीभर मनोरंजन होत असेल. लोकशाही म्हणजे चर्चेचा उत्सव असतो. पण सध्या तो तमाशा उत्सव झालाय, हे मान्य करावेच लागेल.

## घोळसगाव येथे शनि अमावास्या निमित्त उद्या शनेश्वर मल्लिनाथ यात्रा महोत्सवाचे आयोजन

***अक्कलकोट/प्रतिनिधी:***

अक्कलकोट तालुक्यातील घोळसगाव येथील स्वयं जागृत नवसाला पावणारा आणि सर्व धर्मीय भक्तांचे श्रद्धास्थान असलेले शनेश्वर मल्लिनाथ देवस्थान येथे शनी अमावस्या यात्रा महोत्सव निमित्ताने उद्या शुक्रवार २२ व शनिवार २३ ऑगस्ट रोजी देशभक्ती सह विवध धार्मिक, सामाजिक कर्यक्रम आयोजित केले असल्याची माहिती पंच कमिटी अध्यक्ष अप्पासाहेब किवडे यांनी दिली आहे.

जय भारत माता सेवा समिती राष्ट्रीय अध्यक्ष तथा राष्ट्रीय संत श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराज यांचे दिव्य सानिध्यात शनी अमावास्या यात्रा महोत्सव कार्यक्रम नेहमी भक्ती भावनेने मोठ्या उत्साहात साजरी केल्या जातात.प्रत्येक शनी अमावस्या यात्रेस तुळजापूर, उमरगा, आंळद व अक्कलकोट तालुक्यातील भाविक भक्त या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी करतात.यामुळे यंदा यात्रा कमिटीचे वतीने शनी अमावस्या यात्रेची जयत्त तयारी करण्यात येत आहे. शुक्रवार २२ ऑगस्ट रोजी दिवसभरात देशभक्तीसह विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित केले असून रात्रभर देशभक्ती भजन,भारुड,गी गी पदा आदी भरगच्च देशभक्ती व धार्मिक कार्यक्रम आयोजित केलेल्या



आहेत.

शनिवार दि. २३ ऑगस्ट पहाटे श्री चे महापूजा, महारुद्राभिषेक, नवग्रह पूजा, होमहवन इत्यादी कार्यक्रम होणार असून सकाळी सात वाजता घोळसगाव ग्राम प्रदिक्षण करीत श्रीचे भव्य पालखी मिरवणूक विविध वाद्य समवेत श्री शनेश्वर मल्लिनाथ देवस्थान पर्यत निघणार आहे. यानंतर सदगुरु श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराज दर्शन सोहळा, महाप्रसाद इत्यादी कार्यक्रम होणार असून भाविक भक्तांनी सदगुरूचा दर्शन आणि महाप्रसादचा आवश्य लाभ घ्यावी असे आवाहन पंच कमिटीच्या सचिव राजू काळे यांनी केले आहे.

## संत सेना महाराज पुण्यतिथी सांगली, मिरजेत उत्साहात

***सांगली/ प्रतिनिधी:***

नाभिक समाजाचे आराध्य दैवत संत सेना महाराज पुण्यतिथी सांगली, मिरज शहरासह जिल्ह्यात उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी भजन, कीर्तन, पूजा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

मिरजेत शिवाजी चौकातील गर्डर विठ्ठल मंदिरात नाभिक समाजाच्या वतीने संत सेना महाराज पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी पूजा, आरती, भजन, महाप्रसाद यासह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नाभिक समाजाचे विजय अस्वले, राजेंद्र खराडे, अनिल काशीद, अरविंद कदम, राजू



जाधव, बाळासाहेब अस्वले, विनोद लोणकर, अरुण कदम, अनिल सोलकर, आनंदा जाधव, महेश जाधव, कपिल सूर्यवंशी, राकेश खराडे उपस्थित होते

## वन्यप्राणी माकडास खाद्यपदार्थ (केळी) खाऊ घालण्या प्रकरणी गुन्हा दाखल

***सातारा/प्रतिनिधी:***

यवतेश्वर घाट ता.जि. सातारा येथे माकड वन्य प्राण्यास शिवाजी नानासो देशमुख रा.वेळे (कामथी) यांनी खाद्यपदार्थ (केळी) खाऊ घालण्या प्रकरणी त्यांच्यावर वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर प्रकरणी संबंधित आरोपी यांचा जबाब नोंदवला असून आरोपीने गुन्हा केल्याची कबुली दिलेली आहे. सदरची कारवाई उपवनसंरक्षक अमोल सातपुते सहाय्यक वन संरक्षक प्रदीप रौंधळ यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी संदीप जोपळे, वनपाल सातारा सुनील शिंदे,वनरक्षक सातारा,मुकेश राऊळकर व इतर वनमजूर यांनी केली.जाहीर आवाहन. तमाम सातारावासियांना कळविण्यात येते की कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही प्राण्याला छेडणे, त्रास देणे जखमी करणे, खाद्यपदार्थ खाऊ घालने यावर बंदी आहे. या कायद्याचे उल्लंघन केल्यास तुरुंगवास किंवा दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.



तुजारपूर येथे ग्राहक सेवा केंद्राच्या वर्धापनदिनी बोलताना शहाजी पाटील मंचावर वसंत पाटील, अर्जुन निकम, प्रदीप पाटील, संदीप पाटील, अरूणा पाटील

## जय हनुमान पतसंस्थेवर तुजारपूर ग्रामस्थांचा विश्वास : शहाजी पाटील

***इस्लामपूर/प्रतिनिधी:***

तुजारपूरसारख्या खेडेगावात संस्थेने सुविधा केंद्र दोन वर्षापुर्वी सुरू केले. गावाने संस्थेवर विश्वास संपादन केल्यामुळेच शाखेच्या ठेवी २ कोटीपर्यंत झाल्या आहेत. कमी वेळेत ग्राहकांना चांगल्या सुविधा देण्याचा नेहमीच प्रयत्न आहे. या परिसरातील दुधउत्पादक शेतकरी, व्यापाऱ्यांनी संस्थेच्या ठेव व कर्ज योजनांचा लाभ घ्यावा, असे मत संस्थेचे कुटूंबप्रमुख शहाजी पाटील यांनी व्यक्त केले.

जय हनुमान नागरी सह. पतसंस्थेच्या तुजारपूर येथील ग्राहक सुविधा केंद्राचा वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला. तुजारपूरचे पोलिस पाटील वसंत पाटील म्हणाले, गावात जय हनुमान संस्थेची ग्राहक सुविधा केंद्र सुरू झाल्यापासून शेतकरी, महिला व शालेय विद्यार्थ्यांना आर्थिक व्यवहाराची माहीती मिळाली. त्यांची आर्थिक प्रगती झाली आहे. संस्थेत सर्व आधुनिक सेवा मिळत आहेत. त्यामुळे गावाला आर्थिक शिस्त लागली आहे. संस्थेचे हितचिंतक अर्जुन निकम व अर्चना पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. संस्थेच्या मिळणाऱ्या सुविधाबाबत समाधान केले. तुजारपूर विकास सोसायटीचे चेअरमन प्रदीप पाटील, माजी चेअरमन संदीप पाटील, उपसरपंच अरूणा पाटील, महेश पाटील, विकास पाटील, मकरंद पाटील, सतीश पाटील, आनंदा पाटील यांच्यासह महिला सभासद मान्यवर व उरूणवाडी, तुजारपूर येथील गावकरी, संस्थेचे मॅनेजर विक्रांत कांबळे व कर्मचारी उपस्थित होते.

## सातार्यात आज धैर्याचे जंगी स्वागत

### जनता बँक, मावळा फौंडेशन, गुरुकूल स्कूलतर्फे शिवतीर्थावर आयोजन

***सातारा/प्रतिनिधी:***

एव्हरेस्ट बेस कॅम्प, आफ्रिकेतील सर्वात उंच शिखर किलीमांजारो. आता युरोप खंडातील सर्वात उंच शिखर माऊंट एलब्रुस सर करणाऱ्या साताऱ्याची 'अजिंक्यकन्या' धैर्या ज्योती विनोद कुलकर्णी हिचे गुरुवारी (दि. २१) सायंकाळी सात वाजता साताऱ्यातील पोवई नाका येथील शिवतीर्थावर जंगी स्वागत केले जाणार आहेत.

अजिंक्यतारा किल्ल्याच्या अंगाखांद्यावर बागडणाऱ्या धैर्याने ट्रेकींगला फॅशन बनवत प्रारंभी जगातील सर्वात उंच शिखर असलेल्या एव्हरेस्टचा बेस कॅम्प सर केला. त्यावेळी तिचे वय अवघे १२ वर्षे होते. आई-वडिल, पालकांशिवाय ही मोहिम पार पाडणारी ती बहुदा भारतातील पहिली ठरली. त्यानंतर लगेच तिने आफ्रिका खंडातील सर्वात उंच असलेले किलीमांजारो शिखर सर केले. त्यानंतर नुकतेच तिने युरोप खंडातील माऊंट एलब्रुस हे शिखर सर केले आहे.



**धैर्याची कामगिरी**

एव्हरेस्ट बेस कॅम्प –१७,५९८ फूट
माऊंट किलीमांजारो–१९,३४१ फूट
माऊंट एलब्रुस – १८, ५१० फूट

वयाच्या अवघ्या १३ वर्षांत तीन खंडातील तीन शिखरे सर करणारी, तीही पालक सोबत नसतानाही ही कामगिरी करणारी धैर्या भारतातील पहिली मुलगी ठरली आहे, याचा समस्त साताकरांना अभिमान आहे. जनता सहकारी बँक, मावळा फौंडेशन व गुरुकूल स्कूल, गुजराथी अर्बन को ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटीतर्फे धैर्याच्या स्वागताचे नियोजन केले जात आहे. धैर्या गुरुवारी सायंकाळी सात वाजता साताऱ्यात येणार असून, शिवतीर्थावर तिचे जंगी स्वागत केले जाणार आहे. धैर्याचे कौतुक करुन, तिला शाब्बासकी देण्यासाठी सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जनता सहकारी बँकेचे चेअरमन अमोल मोहिते, मावळा फौंडेशनचे सचिव नंदकुमार सावंत यांनी केले आहे.

## वागदरी मंडलमध्ये खरीप पिकाचे मोठ्या प्रमाणात नासाडी तात्काळ नुकसान भरपाई द्यावी

### अन्यथा तीव्र आंदोलन करणार:सरपंच शिवा घोळसगाव यांचा इशारा

***अक्कलकोट/प्रतिनिधी:***

वागदरी मंडल मध्ये खरीप पिकाची मोठ्या प्रमाणात नासाडी झाली असून या नासाडीचे तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी वागदरीचे सरपंच शिवा घोळसगाव यांनी मुख्यमंत्री आणि जिल्हाधिकारी आणि अक्कलकोट चे तहसीलदार यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे.



वागदरीसह परिसरातील गोगाव खैराट भुरी कवठे कीरनळी शिरवळवाडी सदलापूर शिरवळ या परिसरातील खरीप हंगामातील तूर उडीद मुग सोयाबीन कापूस मका भुईमूग ही सर्व पिके पूर्णपणे वाया गेल्याने या पिकांचे पंचनामे करून नुकसान भरपाई करून देण्याची मागणी अक्कलकोट येथील तहसीलदार यांच्याकडे करण्यात आला. वागदरी परिसरात आश्लेषा नक्षत्राच्या पावसाने धुमाकूळ घातला आहे. गेल्या पंधरा दिवसापासून सतत पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे या परिसरातील संपूर्ण शिवारात पाणी साचले आहे. शेती ना तलावाचे रूप आले आहे.

परिसरातील संपूर्ण पिके पाण्याखाली पाण्याखाली गेल्याने खरीप हंगामा पूर्णपणे वाया गेला आहे. नगदी म्हणून ओळखले जाणारे खरीप हंगामातील सोयाबीन उडीद मूग मका कापूस ही पिके १००% वाया गेल्याने या परिसरातील शेतकऱ्यांची खूप मोठी आर्थिक नुकसान झाला आहे. हाताला आलेली मूग व उडीद पाणी लागून सडून गेल्याने शेतकरी हतबल झाला आहे. तेव्हा वागदरी जिल्हा परिषद गटात संबंधित महसूल व कृषी खात्याने या परिसरातील पिकांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना योग्य तो नुकसान भरपाई व मोबदला द्यावा अशी मागणीचे निवेदन अक्कलकोट येथील तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार यांच्याकडे वागदरीचे युवा सरपंच शिवानंद घोळसगाव यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शेतकऱ्यांनी केली आहे.

यावेळी वागदरीचे सरपंच शिवानंद घोळसगाव उपसरपंच पंकज सुतार श्रीशैल ठोंबरे मल्लिनाथ ठोंबरे तंटामुक्त समितीचे अध्यक्ष शानप्पा मंगाने घालया मठपती ग्रामपंचायत सदस्य श्रीकांत भैरामडगी बसवराज वरनाळे बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते.

> वागदरी आणि पंचक्रोशी मध्ये सतत च्या पावसामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून ओला दुष्काळ पडण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे यामुळे प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना सरसकट मदत जाहीर करावे अन्यथा जिल्हा परिषद गटातील सर्व शेतकऱ्यांना घेऊन तीव्र आंदोलन करण्यात येईल.
>
> शिवा घोळसगाव
> सरपंच ग्रामपंचायत वागदरी

## शेतातील पिकांचे त्वरित पंचनामे करून नुकसान भरपाई द्या

### सरपंच सौ. वनिता सुरवसे:गोगांवसह पंचक्रोशीत मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान

***अक्कलकोट/ प्रतिनिधी::***

अति पाऊसामुळे गोगांव, खेराट, भुरीकवठे, वागदरी सह अनेक गावात मोठ्या प्रमाणात शेती पिकांचे नुकसान झालेले असून त्या पिकांचे त्वरित पंचनामे करण्याबाबत तहसीलदार यांनी आदेश द्यावे अशी मागणी गोगांवच्या सरपंच सौ वनिता सुरवसे यांनी तहसीलदार, आमदार व जिल्हाधिकारी यांच्या कडे मागणी केली आहे.



वागदरी मंडल मध्ये प्रजन मापक यंत्रणा नसल्यामुळे सदर माहिती प्रशासनास कळण्यास उशिरा लागतो त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन देखील त्यांना मदत मिळत नसल्याने शेतकरी चिंताग्रस्त झालेले आहेत. यंदा मे महिन्यात पाऊस आल्याने पेरणी लवकर करण्यात आली होती.मध्यंतरी पाऊस गेल्याने पिकाची वाढ खुंटली, परंतु गेल्या वीस पंचवीस दिवसापासून सतत पाऊस चालू असल्याने पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. उडीद, मूग हे पीक काढणीस येऊन देखील पीक शेतकऱ्यांना काढता आले नाही शेतात मोठया प्रमाणात पाणी साचून



शेती पिकांचे प्रचंड असे नुकसान झाले आहे.सर्व शेतकऱ्यांचे पिके पाणी लागून गेले आहे. सोयाबीन, तूर, या पिकांना पाणी लागून नुकसान झाले आहे. शेताकऱ्यांनी खाजगी सावकाराकडून पैसे काढून बी बियाणे, खत आणून पेरणी केली आहे. यावर्षी सोलापूर जिल्हाबँक आणि सोसायट्या नी सुद्धा कर्ज पुरवठा केला नाही,त्यामुळे लोकांकडून घेतलेले कर्ज फेडायचा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उपस्थित झाला आहे. जर मदत नाही मिळाली तर शेतकऱ्याकडून येत्या निवडणुकीत त्याचे परिणाम भोगावे लागतील हे प्रशासन आणि सरकारने ध्यानात घ्यायला हवे. यासाठी शासनाने त्वरित पंचनामे करून शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी मदत त्वरित करावी अशी मागणी सरपंच वनिता सुरवसे यांनी केली आहे.

> वागदरी मंडल मध्ये मोठ्या प्रमाणात पर्जन्यवृष्टी होऊन शेतीचे मोठे नुकसान झाले आहे वागदरी मंडल मध्ये प्रजन मापक यंत्रणा नसल्याने यांची माहिती प्रशासनास मिळणे अवघड झाले आहे त्यासाठी या मंडल मधील सर्व ग्रामपंचायत यांनी ग्रामसभेत शेतीच्या नुकसानीचे त्वरित पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याबाबत ठराव घेण्यात यावे
>
> कमलाकर सोनकांबळे
> उपसरपंच, गोगांव

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक श्री.शशिकांत आकाराम पाटील यांनी प्रीतिसंगम प्रिंटर्स, कोयना औद्योगिक वसाहत, मलकापूर–कराड येथे छापून गोदावरी प्लाझा, हेड पोस्टाजवळ, शनिवार पेठ कराड, येथे प्रसिद्ध केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. R.N.I.No.MAHMAR./२००१/१०३३८ रजिस्टर No.MAHMAR/14511/13/1/96/Te पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 *मुख्य कार्यालय:– गोदावरी प्लाझा, हेड पोस्ट जवळ, शनिवार पेठ कराड, जि.सातारा, पिनकोड – ४१५११० फोन (०२१६४)२२७७२५,,फॅक्स २२६९२५, * सातारा कार्यालय:– संजीवन सीटी स्कॅन शेजारी, सिव्हील हॉस्पिटल रोड, सातारा फोन नं:–९२२६३९८८१७ RNI.mar/२००१/१०३३८.
email-pritisangamkarad@gmail.com

# कोयना वसाहतीला आदर्श ग्रामपंचायत करण्याचा संकल्प

## डॉ.सुरेश भोसले; स्व.जयमाला भोसले स्मृती उद्यान व कै.भिकोबा थोरात प्रवेशद्वाराचे लोकार्पण

**कराड/प्रतिनिधी : -**
कोयना वसाहत ही कराड तालुक्यातील एक प्रगतिशील वसाहत असून शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि सांस्कृतिक परंपरांमुळे या गावाला विशेष ओळख आहे. गावाचा पुढील २५ वर्षांचा ठोस विकास आराखडा तयार करुन, कोयना वसाहतीला आदर्श ग्रामपंचायत करण्याचा आमचा संकल्प आहे, असे प्रतिपादन कृष्णा विश्व विद्यापीठाचे कुलपती डॉ. सुरेश भोसले यांनी केले.

कोयना वसाहत (ता. कराड) येथे साकारण्यात आलेल्या स्व. जयमाला जयवंतराव भोसले स्मृती उद्यान आणि कै. भिकोबा दादू थोरात (नाना) प्रवेशद्वाराचे लोकार्पण कृष्णा विश्व विद्यापीठाचे कुलपती डॉ. सुरेश भोसले आणि आ.डॉ. अतुल भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी सौ. उत्तरा भोसले, श्री. विनायक भोसले, कृष्णा कारखान्याचे संचालक दयानंद पाटील, धोंडीराम जाधव, कृष्णा बँकेचे संचालक शिवाजीराव थोरात, कोयना वसाहतीच्या सरपंच सुवर्णा वळीव, उपसरपंच उमेश कुलकर्णी, श्री शिवराज सहकारी गृहनिर्माण सोसायटीचे चेअरमन शरद पाटील, व्हाईस चेअरमन सौ. प्रियांका कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. सुरेश भोसले म्हणाले, कोयना वसाहतीला आदर्श ग्रामपंचायत करण्याचा आमचा संकल्प आहे. पर्यटनाच्या दृष्टीने कोयना वसाहतीत प्रचंड क्षमता असून, आगाशिव डोंगर परिसरातील पर्यटनाला चालना मिळाल्यास इथे पर्यटनाचे नवे केंद्र निर्माण होऊन, त्याचा लाभ आपल्या गावाला होऊ शकेल. गावातील सांडपाणी व कचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या उभारणीसाठी तातडीने प्रयत्न करण्याची गरज आहे. येत्या काळात गृहिणींना लघुउद्योग सुरू करण्यासाठी आर्थिक पाठबळ आणि सार्वजनिक जागांचा विकास करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

आमदार डॉ. अतुल भोसले म्हणाले, की कोयना वसाहतीमध्ये


कोयना वसाहत : स्व. जयमाला जयवंतराव भोसले स्मृती उद्यानाच्या लोकार्पणप्रसंगी बोलताना कृष्णा विश्व विद्यापीठाचे कुलपती डॉ. सुरेश भोसले. बाजूस आ.डॉ. अतुलबाबा भोसले, सौ. उत्तरा भोसले, विनायक भोसले व अन्य मान्यवर.

सुशिक्षित व उच्चविद्याविभूषित लोकांची मोठी वस्ती आहे. या गावाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी येत्या २५ वर्षांचा दूरदर्शी विकास आराखडा आखण्याची गरज आहे. जेणेकरुन अर्बन प्लॅनच्या धर्तीवर या गावाचा विकास होईल. येत्या काळात केंद्र व राज्य सरकारच्या अनुदानाचा लाभ घेऊन, 'सोलर ग्राम' म्हणून कोयना वसाहतीची ओळख निर्माण करण्याचा माझा ध्यास आहे.

येत्या साडेचार वर्षांत कोयना वसाहतीतील प्रत्येक गल्लीतील रस्त्यांसाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल. तसेच भूमिगत गटर व ड्रेनेजसाठी आराखडा तयार करून राज्य सरकारकडून निधी आणला जाईल. गावातील सर्व स्ट्रीटलाईट सौर ऊर्जेवर आधारित करण्याचा मानस आ.डॉ. भोसले यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाला बालिश थोरात, प्रमोद पाटील, डॉ. राजेंद्र पाटील, सुधाकर गुरव, बाळासाहेब वाठारकर, सौ. सुनीता थोरात, सुजाता पवार यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, शिवराज सहकारी गृहनिर्माण सोसायटीचे सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# काळजी करु नका, लागेल ती मदत करू

## निशिकांत पाटील

**इस्लामपूर/प्रतिनिधी : -**
काळजी करु नका, लागेल त्या मदतीसाठी मी तुमच्याबरोबर आहे, असा भावनीक आधार इस्लामपूर विधानसभा मतदार संघातील पुरग्रस्त गावातील नागरीकांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सांगली जिल्हाध्यक्ष निशिकांत भोसले-पाटील यांनी दिला.

यावेळी मंडल अधिकारी, ग्रामविकास अधिकारी यांची उपस्थिती होती. सध्या पावसाचा जोर वाढला असून, ओढे व नदी पात्रातील पाणी पातळी वाढली आहे. यामुळे नदी काठच्या गावातील नागरीकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. काही गावामध्ये नदी पात्रातील पाणी शिरले आहे, अशा गावांना व गावातील नागरीकांना निशिकांत भोसले-पाटील यांनी रेठरे हरणाक्ष, बिचुद, नरसिंहपूर, शिरटे, कोळे, बहे आदि गावांना व समक्ष भेटी देऊन पूर परिस्थितीची पहाणी केली. नागरिकांच्या सुरक्षेच्यादृष्टीने लागेल ती मदत करणार आहे, मी तुमच्याबरोबर असून, काळजी करुन नका, असा आधार त्यांनी दिला,. याचबरोबर प्रशासन अधिकारी यांनाही उपाययोजनेच्या दृष्टीने सुचना दिल्या.

यावेळी प्रकाश हॉस्पिटल एण्ड रिसर्च सेंटरचे मानद सचिव धैर्यशील मोरे, सरपंच शोभाताई जगताप, निवास पाटील, यदुराज थोरात, दिलीप लाड, जयवंत देसाई, सुनील पाटील, सुभाष जगताप, शिरीष रसाळ, संग्राम पाटील, संग्राम कोळेकर आदिसह अन्य मान्यवर, नागरिक उपस्थित होते.


तांबवे : कोयना नदीला आलेल्या पुराची पाहणी करताना पोलीस निरीक्षक महेंद्र जगताप आणि कर्मचारी.

# नागरिकांनी पुराच्या पाण्यात उतरू नये

## महेंद्र जगताप; तांबवे पुलावर पोलिसांचा बंदोबस्त

**तांबवे/ प्रतिनिधी : -**
कोयना धरणातून पाण्याचा विसर्ग मोठ्या प्रमाणात करण्यात आला आहे. त्यामुळे कराड तालुक्यातील कोयना नदीवरील तांबवे, सुपने, साजूर या नदीकाठच्या गावांना पूरस्थिती निर्माण झाली आहे. नागरिकांनी पाणी पाहण्यास गेल्यानंतर पाण्यात उतरू नये असे, आव्हान कराड तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महेंद्र जगताप यांनी केले आहे.

कराड तालुक्यातील नदीकाठच्या गावांची पाहणी आणि पोलीस बंदोबस्त याचा आढावा पोलीस निरीक्षक महेंद्र जगताप यांनी घेतला. तांबवे येथे कोयना पुलावरती पाणी पाहण्यासाठी आलेल्या नागरिकांना पोलिसांनी सूचना केल्या. यावेळी पोलीस कर्मचारी रवींद्र देशमुख, धनंजय कोळी, गणेश वेदपाठक, जयसिंग राजगे, विनोद माने, तांबवे गावचे पोलीस पाटील पवन पाटील, अनिकेत पाटील आदी उपस्थित होते.

कोयना नदीकाठी असलेल्या तांबवे, किरपे, सुपने, म्होप्रे, साजूर, येरवळे या गावचा आढावा पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घेतला. तसेच पोलीस पाटील यांना योग्य त्या सूचना देण्यात आल्या. पोलीस कर्मचारी नागरिकांच्या सेवेसाठी आहेत. मात्र नागरिकांनी, तरुणांनी नदीला मोठ्या प्रमाणात पाणी आल्याने त्यामध्ये उतरू नये. पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आव्हान महेंद्र जगताप यांनी केले.

# आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूका एकीने जिंकू

## आ. सदाभाऊ खोत

**इस्लामपूर/प्रतिनिधी:**
आगामी नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या सर्व निवडणूका महायुतीच्या माध्यमातून सर्वांनी एकत्र येवून ताकतीने लढवून जिंकूया. येणारा काळ हा महायुतीसाठी अत्यंत पुरक व पोषक आहे. विश्वनाथ डांगे तुमच्या मनात जे आहे. ते आगामी काळात सत्यात आणण्याचे काम सर्वांनी मिळवून करूया. असे मत आ. सदाभाऊ खोत यांनी व्यक्त केले.

उरुण ईश्वरपूरातील पुष्कर मंगल कार्यालयात विश्वनाथ डांगे वाढदिवस गौरव समितीच्या वतीने मोठ्या उत्साहात वाढदिवस सोहळा पार पडला. भाजपाचे जिल्हाध्यक्ष सम्राट महाडीक म्हणाले, माजी मंत्री आण्णासाहेब डांगे यांच्या भाजप घरवापसीने सर्व कार्यकर्त्यांना मोठं बळ व ताकद मिळाली आहे. पूर्वीपासुनच महाडिक व डांगे कुटुंबाने सामाजिक व राजकिय क्षेत्रात एकत्रित काम केले


विश्वनाथ डांगे यांच्या सत्कार प्रसंगी आ.सदाभाऊ खोत, आ.सत्यजित देशमुख, माजी आ.भगवानराव साळुंखे, राहुल महाडीक, निशिकांत पाटील, सम्राट महाडीक, समित कदम, अँड. चिमण डांगे, आनंदराव नलावडे, सागर मलगुंडे

आहे. तोच वारसा व वसा आम्ही यापुढेही कायम चालवू, आ.सत्यजित देशमुख म्हणाले, चिमण डांगे व विश्वनाथ डांगे यांना ज्या क्षेत्रात लागेल त्या क्षेत्रात मोठा पाठिंबा देणार आहे. सर्वांनी मिळून केंद्र व राज्यसरकारच्या विविध सार्वजनिक व वैयक्तीक लाभाच्या योजना तळागाळात पोहोचवूया. आगामी सर्व निवडणूकात विजयश्री खेचुन आणू. कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे. राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष, माजी नगराध्यक्ष निशिकांत पाटील म्हणाले, मी आता नगरपालिकेला उभा राहणार नाही. विश्वनाथ डांगे तुम्ही निवडणूकीच्या तयारीला लागावे, नगराध्यक्षपदाचे आरक्षण खुले असो अथवा ओबीसी आम्ही सर्वजन तुमच्या पाठिशी खंबीरपणे उभे आहोत. आगामी नगरपालिका निवडणूकीत महायुतीची सत्ता येणार आहे. आण्णासाहेब डांगे यांच्या भाजप प्रवेशाने विरोधकांची दमछाक झाली आहे. त्यांच्या पायाखालची वाळू वेळी भाजपाचे नेते, जिल्हा बँकेचे संचालक राहुल महाडिक, जनसुराज्यचे नेते समित कदम, माजी आ.भगवानराव साळुंखे यांनी मनोगते व्यक्त केली. माजी नगराध्यक्ष ॲड. चिमण डांगे, जनसुराज्य पार्टीचे समित कदम, जिल्हा नियोजन मंडळाचे सदस्य आनंदराव नलावडे, शिवसेना तालुकाप्रमुख सागर मलगुंडे उपस्थित होते.

भाजपाचे जयराज पाटील, माजी नगराध्यक्ष आनंदराव मलगुंडे, माजी नगरसेवक एल.एन.शहा, अशोकराव देसाई, श्रीकांत माने, अँड. संपतराव पाटील, कपिल ओसवाल, मृणाल पाटील, अमित ओसवाल, संजय हवलदार, कृष्णा कारखान्याचे संचालक अविनाश खरात, जि.प. सदस्य भानुदास विरकर, सतिश महाडिक, शहर भाजपाचे अध्यक्ष संदीपराज पवार, भानुदास खरात, प्रकाश ऐडगे, सी.एच. पाटील, सुनिल मलगुंडे, प्रकाश कनप, डी. वाय. तांदळे, सनी खराडे, चंद्रशेखर तांदळे, शिवाजी खोत, उमेश गावडे, जयकर निकम, रघुनाथ मोटे, धनपाल माळी, अशोकराव पाटील, बजरंग गावडे, दिग्विजय मोहिते, जिवनकुमार जाधव, राजेंद्र लाड, मानसिंगराव वाघ यांच्यासह उरुण ईश्वरपूर शहर व तालुक्यातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी फटाक्यांची जोरदार आतषबाजी करण्यात आली. वाढदिवस गौरव समितीचे अध्यक्ष मंदार जाधव, राजेश माने, बजरंग कदम, प्रदिप विगुर्लेकर, विकास चौगुले, वशीम शेख, बाळासाहेब चाऊस, संजय कुशिरे यांनी संयोजन केले. गौरख समितीचे अभिजित रासकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. गोपाल नागे यांनी आभार मानले.

# कृष्णा घाटावरील १०० हून अधिक जनावरे सुरक्षितस्थळी हलवली

## महापालिका आयुक्त व सहाय्यक निरीक्षक शिंदे यांच्याकडून पाहणी

**सांगली / प्रतिनिधी:-**
गेल्या तीन दिवसांपासून पडणारा मुसळधार पाऊस व कोयना धरणातून पाण्याचा विसर्ग वाढविल्याने सांगली, मिरज येथील कृष्णा नदीवर पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. भविष्यात पाण्याच्या पातळीत वाढ होण्याची शक्यता लक्षात घेऊन मिरज कृष्णा घाटावरील १०० हून अधिक जनावरे सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत करण्यात आली आहेत.

गांधी चौक पोलिस ठाण्याचे





सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप शिंदे यांनी महापालिका आयुक्त सत्यम गांधी, अतिरिक्त आयुक्त राहुल रोकडे, उपायुक्त स्मृती पाटील यांच्या सहकार्याने नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत होण्याचे आवाहन करुन १०० हून अधिक जनावरे सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत करण्यात आली आहेत. मिरज येथील कृष्णा घाट परिसरामध्ये पेट्रोलिंग व इतर आपत्ती व्यवस्थापन अनुषंगाने महापालिका आयुक्त सत्यम गांधी यांनी महापालिका उपायुक्त स्मृती पाटील यांच्या समवेत पाहणी केली आहे. सध्या पूर परिस्थिती अनुषंगाने सर्व स्थिती नियंत्रणात असल्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक शिंदे यांनी सांगितले.

### हुल्लडबाजी केल्यास कठोर कारवाई

संभाव्य महापूराचा धोका लक्षात घेऊन कृष्णा घाटावर कडेकोट पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. नागरिकांनी घाटापासून दूर रहावे. घाट परिसरात स्टंटबाजी, हुल्लडबाजी केल्यास कठोर कारवाई करण्यात येईल.

संदीप शिंदे
सहा. पोनि.गांधी चौक ठाणे

# वाईमध्ये एआय तंत्रज्ञानावर आधारित ऊस शेतीवरील चर्चासत्राचे आयोजन

## मदनदादा भोसले

**वाई/प्रतिनिधी:**
येथील जनता शिक्षण संस्था आणि बारामती येथील ग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, कृषी विज्ञान केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दि. २१ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १०.४५ वाजता किसन वीर महाविद्यालयामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता व ऊस शेती या विषयावार चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती जनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मदनदादा भोसले यांनी दिली.



याबाबत माहिती देताना ते म्हणाले, संस्थेच्या किसन वीर महाविद्यालयामध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये सुमारे ७० ते ७५ टक्के विद्यार्थी शेतकरी पार्श्वभूमी असलेले आहेत. त्यामुळे त्यांना ऊस शेती करताना नवतंत्रज्ञानाची माहिती व्हावी या उद्देशाने तसेच महाविद्यालयाच्या उभारणीमध्ये कार्यकर्ते, शेतकरी यांनी स्वत:ची मालमत्ता बँकेकडे गहाण ठेवून महाविद्यालय व संस्था उभारणीला सक्रिय मदत केली याची जाणीव मनात ठेवून त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या हेतूने शेतकऱ्यांच्यासाठीही सदरच्या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आलेले आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानामुळे ऊसाच्या उत्पन्नात एकरी ४०% पर्यंत वाढ होत असल्याचे, साखर उताऱ्यात २% वाढ होत असल्याचे तसेच आधुनिक सिंचन पद्धतीने पाण्याची ५०% बचत, या तंत्रज्ञानाचा वापर केल्याने ३०% रासायनिक खतांची बचत होत असल्याचे बारामती येथील संशोधनात सिद्ध झाले आहे. या तंत्रज्ञानाचा वापर केल्याने जमिनीचा पोत व सेंद्रिय कर्ब वाढतो तसेच हवामानाचा अंदाज अधिक अचूक मिळतो. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून बारामती येथील सुमारे एक हजार शेतकऱ्यांनी आपल्या शेतात प्रत्यक्ष ऊस पीक घेतले असून त्याला अपेक्षित यश प्राप्त झाले आहे.

एआय (AI) तंत्रज्ञानाने शेतकऱ्यांचा आर्थिक फायदा होण्यासोबत शेतीचा, पर्यावरणाचा विकास होत आहे. त्यामुळे या चर्चासत्राचे आयोजन केले असून त्यामध्ये बारामती ग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे चेअरमन राजेंद्र पवार, कृषी विज्ञान केंद्राचे तज्ज्ञ डॉ. विवेक भोईटे तसेच ग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, सुक्ष्मजीवशास्त्र विभागातील सहायक प्राध्यापक डॉ. योगेश फाटके हे मार्गदर्शन करणार आहेत.

या चर्चासत्रासाठी नोंदणी संपूर्णपणे मोफत असून; प्रथम नोंदणी करणाऱ्या ५०० शेतकऱ्यांना कार्यशाळेस प्रवेश दिला जाणार आहे. तरी या चर्चासत्रासाठी विद्यार्थी व शेतकऱ्यांनी २१ ऑगस्टपूर्वी नोंदणी करावी, असे आवाहन जनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मदनदादा भोसले, संस्था सचिव डॉ. जयवंत चौधरी व प्राचार्य डॉ. गुरूनाथ फगरे यांनी केले आहे.

# आपत्ती काळात नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य द्या

## जिल्हाधिकारी संतोष पाटील:अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मुख्यालय, कामाच्या ठिकाणी २४/ ७ हजर रहा

**पाटण/प्रतिनिधी:-**
जिल्ह्यात अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला असून या पार्श्वभूमीवर तालुका आपत्ती व्यवस्थापन कक्ष २४/ ७ कार्यरत ठेवा. अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मुख्यालय, कामाच्या ठिकाणी २४/७ हजर रहा. येणाऱ्या प्रत्येक कॉलला सकारात्मक प्रतिसाद द्या. पूरपरिस्थितीत बाधित होणाऱ्या प्रत्येक कुटुंबाला आवश्यकता भासणाऱ्या ठिकाणी नागरिकांचे व पशुधनाचे तातडीने स्थलांतरण करा आणि अनुषंगिक सुविधांची आवश्यक ती उपलब्धता ठेवा,नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य द्या. नदीकाठच्या गावांनी सतर्कत बाळगून नागरिकांनीही पुराच्या पाण्यात जाणे टाळावे असे निर्देश जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी दिले.

जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी पाटण तालुक्यातील पूरपरिस्थितीची पाहणी केली त्यावेळी ते बोलत होते. यावेळी



पाटणचे प्रांताधिकारी टोम्पे, तहसिलदार गुरव महसूल, आरोग्य, वन विभागाचे अधिकारी, कर्मचारी ग्रामस्थ उपस्थित होते.

जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी पाटण तालुक्यातील नावडी, मंद्रुल हवेली, पाटण, हेळवाक या ठिकाणी पूरस्थितीची पाहाणी केली यावेळी ते बोलताना म्हणाले धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचा वाढता जोर पाहता कोयनेसह सर्व धरणातील विसर्ग वाढवावा लागू शकतो. कोयना, कृष्णाच्या अनुषंगाने पाटण कराड तालुक्यांनी विशेष दक्ष राहावे, सतत पाऊस सुरु असल्याने जेवढी पाण्याची आवक आहे तेवढे पाणी सोडले जात आहे. धरणांची साठवण क्षमता संपुष्टात आली आहे त्यामुळे कोयना धरणातून एक लाख क्युसेकने पाणी सोडले जाऊ शकते. अशा परिस्थितीत जी कुटूंबे बाधित होतात अशी कुटूंबे तात्काळ स्थलांतरीत करावीत. तसेच जे रस्ते व पुलांवर पाणी येऊन वाहतूकीसाठी बंद झाले आहेत त्याची माहिती ताबडतोब जिल्हा प्रशासनाला द्यावी. दरडप्रवण गावात तलाठी ग्रामसेवक यांनी फिल्डवर जाऊन पाहणी करावी व लोकांशी संवाद साधावा. वैद्यकीय असणारे रुग्ण, गरोदर महिला अशा रुग्णांची माहिती संकलीत करुन ठेवावी. विशेषत: महाबळेश्वर, जावळी, पाटण या भागात अधिक दक्षता घ्यावी. जिल्ह्यात धबधब्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर असून अशा ठिकाणी पर्यटक अडकले असल्यास माहिती घ्यावी, ज्या बसस्थानकांना पुराच्या पाण्याचा फटका बसतो अशा ठिकाणी प्रवासी अडकले आहेत का याची शहानिशा करावी, आणि अशी स्थिती असल्यास अशा प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी.

# कराडकरांना कोणती अडचणी येऊ देणार नाही

पान १ वरुन

ते म्हणाले, संभाव्य पूर परिस्थितीनुसार आवश्यक त्या उपयोजना प्रशासनाने केल्या आहेत. कोयना धरणातून सुमारे एक लाख क्युसेक पाण्याचा विसर्ग चालू करण्यात आला आल्याने कराडला पूर परिस्थितीचा धोका वाढला आहे. ज्या लोकांना स्थलांतरित करणे गरजेचे आहे, त्यादृष्टीने उपायोजना करण्यात आल्या आहेत.

तसेच आरोग्य यंत्रणेलाही हायलर्ट करण्यात आले असून, अशा परिस्थितीत साथीच्या रोगांचा फैलाव होणार नाही, याची काळजी घेण्यात येणार आहे. सर्व यंत्रणा काम चांगले आहे. पूर परिस्थिती निर्माण झाली तरीही, कोणतेही जीवित हानी होणार नाही, याची पुरेपूर काळजी घेण्यात येणार आहे. त्या दृष्टीने प्रशासनाने ठोस उपाययोजना केली असल्याचे आमदार भोसले यांनी सांगितले.



# डॉल्बी, लेझर लाईट लावल्यास गणेश मंडळावर होणार कारवाई

## डिवाय एसपी बाळासाहेब भालचिम;कायदा सुव्यवस्था राखत गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन

**वाई/प्रतिनिधी:**
वाई शहर व पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गणेशोत्सव मंडळांनी गणेशोत्सव नियम पाळून साजरा करावा, जे मंडळ डॉल्बी आणि लेझर लाईटचा वापर करून आगमन आणि विसर्जन मिरवणूक काढतील त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशा शब्दात वाईचे डी.वाय. एस.पी.बाळासाहेब भालचिम यांनी कडक सुचना दिल्या. वाई पोलीस ठाण्याच्या आवारात गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत ते बोलत होते.

यावेळी पोलीस निरीक्षक जितेंद्र शहाणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल गवळी, नायब तहसीलदार धनश्री यादव , महावितरणचे उपकार्यकारी अभियंता गणेश कोळी, सहाय्यक गटविकास अधिकारी बाळासाहेब जाधव, पालिका बांधकाम अभियंता अनंत प्रभुणे यांच्यासह पोलीस अधिकारी, कर्मचारी, शासकीय अधिकारी आणि गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. प्रत्येक मंडळाची पोलिसात नोंद होणं गरजेची आहे. त्यासाठी पोलिसांकडून सर्वतोपरी सहकार्य केले जाईल. समाजाच्या भावना दुखावतील अशी वर्तणूक, देखावे नको, वीज कनेक्शनसाठी महावितरणची परवानगी आवश्यक आहे, प्रत्येक मंडळास वेळेचे, आवाजाचे बंधन राहील, आदेशाचे उल्लंघन केल्यास कारवाई केली जाईल असा इशारा त्यांनी दिला. मंडळांनी पारंपरिक वाद्यांचा वापर करावा, लोकोपयोगी, सामाजिक उपक्रम राबवण्याचे आवाहन ही त्यांनी केले. तसेच काही ग्रामपंचायतींनी डॉल्बी वर बहिष्कार घातला आहे त्यांचे अनुकरण करावे, गुन्हेगारी प्रवृत्ती आढळल्यास पोलिसांशी संपर्क साधावा, तसेच इतर आवश्यक परवानग्यानंतरच पोलिसांकडून परवानगी देण्यात येईल, पोलिसांकडून घेण्यात येणाऱ्या गणेशोत्सव स्पर्धेत प्रथम तीन मंडळंना पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येईल, अशा सूचना त्यांनी दिल्या.

दरम्यान यावेळी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी जिवंत देखव्यासाठी वेळ वाढवून मिळावी, मिरवणूकीदिवशी रस्त्यावरील बंद वाहने काढण्याची विनंती प्रशासनाकडे केली.

मंडळानी डिझेलचा ज्वलनशील पदार्थांचा साठा करू नका, दारू पिणारे आढळ्यास गुन्हा दाखल करणार, डॉल्बी वाजल्यास मंडळाचे रेजिस्ट्रेशन रद्द करण्यात येईल. डेकोरेशनची उंची विद्युत पुरवठ्यास अडथळा नसावा. पर्यावरण पूरक गणपती मूर्ती बसावा. गणपती उत्सवात ईदचा सण आहे. तरी कायदा सुव्यवस्थेची परस्थिती निर्माण होणार नाही याची काळजी घेणे.

– जितेंद्र शहाणे पोलीस निरीक्षक वाई पोलीस स्टेशन

# अतिवृष्टीमुळे चिपळूलला जाणाऱ्या बसच्या फेऱ्या रद्द

## मुंबईला धावणाऱ्या एसटी बसेस वाशीपर्यंतच

**सांगली / प्रतिनिधी:**
राज्यात सर्वत्र जोरदार पाऊस कोसळत आहे. मुंबई व कोकणमध्ये अतिवृष्टी सुरू आहे. मुंबई, ठाणे, पालघर परिसरात ढगफुटीसदृश पाऊस झाल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. तसेच कोकणात देखिल रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण आणि राजापूर तालुक्याला पावसाने झोडपले आहे. या पार्श्वभूमीवर एसटीच्या सांगली विभागातून मुंबईकडे जाणाऱ्या एसटी वाशीपर्यंत धावणार आहेत तर कोकणातील चिपळूण शहरात पाणी आल्याने चिपळूण, दापोलीकडे जाणाऱ्या बसेस रद्द केल्या आहेत.

पावसामुळे मुंबई महापालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी पहाटे ४ पासून ते दुपारी ३ पर्यंत ११ तासांच्या कालावधीत अतिवृष्टीची नोंद झाली आहे. मुंबईमधील अनेक रेल्वे ट्रॅक पाण्याखाली गेले आहेत. या पार्श्वभूमीवर एसटीच्या सांगली विभागातून मुंबईकडे जाणाऱ्या बसेस वाशीपर्यंत धावणार आहेत. मंगळवारी रात्रीची मिरज-मुंबई व सांगली-मुंबई ही एसटी वाशीपर्यंत सोडण्यात आली.

तसेच बुधवारी सकाळी मुंबईकडे जाणाऱ्या एसटी बसेस वाशीपर्यंत सोडण्याचा निर्णय घेतला. रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण, राजापूर तालुक्यात अतिवृष्टी झाली आहे. यामुळे मंगळवार व बुधवारच्या मिरज-दापोली व कवठेमहांकाळ - दापोली या एसटी बसेस रद्द करण्यात आल्या आहेत.

मुंबई व कोकणातील पावसाचे अपडेट घेतले जात आहेत. अतिवृष्टीमुळे मुंबईकडे जाणाऱ्या बसेस वाशीपर्यंत सोडण्याचा निर्णय घेतला आहे. तर कोकणातील चिपळूणकडे जाणाऱ्या मिरज-दापोली व मिरज-कवठेमहांकाळ बस फेरी रद्द करण्यात आली असल्याचे सांगलीचे विभाग नियंत्रक सुनील भोकरे यांनी सांगितले.

# भूविकास बँकेजवळील...

पान १ वरुन

यामध्ये कर्मवीर चौकातील भूविकास बँकेचे जवळील अतिक्रमणे प्रामुख्याने हटवण्यात आली. त्यामुळे येथील सिग्नलने मोकळा श्वास घेतला आहे. त्याचबरोबर बस स्थानक परिसर, विजय दिवस चौक, शनी मंदिर परिसर आदी ठिकाणी ही मोहीम राबवण्यात आली.

यापुढेही पालिकेची अतिक्रमण हटाव मोहीम चालू राहणार असून, संबंधित आणि तात्काळ अतिक्रमण काढून घ्यावेत, असे आवाहनही पालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# कराडमध्ये सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा सत्र संपन्न

## प्रशासकीय इमारतीत अधिकारीवर्गासाठी जनजागृती; सायबर वॉरियर्सना बक्षिस वितरण

**कराड/प्रतिनिधी : -**

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड आणि क्विक हील फाउंडेशन यांच्या सहकार्याने स्वातंत्र्य दिनानिमित्त सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या उपक्रमांतर्गत येथील मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीत विशेष सायबर जनजागृती सत्र घेण्यात आले. तहसील कार्यालयातील कर्मचारी वर्गासह विविध शासकीय विभागातील अधिकारी या सत्रात सहभागी झाले. डॉ. प्रियंका शिंदे या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा उपक्रमाच्या समन्वयक म्हणून कार्यरत असून, त्यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयीन विद्यार्थी विविध शासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था व सामाजिक व्यासपीठांवर सायबर जनजागृती उपक्रम राबवत आहेत. यांतर्गत सायबर वॉरियर्स क्लबचे सदस्य तन्मय सावंत आणि मुसद्दिक खान यांनी सायबर सुरक्षेचे महत्त्व, ऑनलाईन फसवणुकीचे विविध प्रकार, सिम-स्वॅप,



डीपफेक, व्हॉइस क्लोनिंग, ब्लूटूथ व वाय-फायद्वारे होणाऱ्या फसवणुका यांची माहिती देत बचावाचे योग्य उपायही सांगितले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील, पोलीस उप अधीक्षक सौ. राजश्री पाटील, तहसीलदार श्रीमती कल्पना ढवळे-भंडारे, नायब तहसीलदार बाबुराव राठोड, तालुका कृषी अधिकारी, तसेच कराड व मलकापूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, गट विकास अधिकारी उपस्थित होते.

प्रशासकीय इमारतीतील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. तहसीलदार कल्पना ढवळे-भंडारे यांनी उपक्रमाचे कौतुक करत सायबर सुरक्षेबाबत अधिक जनजागृतीची गरज व्यक्त केली. त्यांनी लवकरच आणखी सविस्तर सायबर सत्र आयोजित करण्याची घोषणा केली. यावेळी श्रीनिवास पाटील यांनी सायबर वॉरियर्सचा सत्कार करून बक्षिसे प्रदान केली. सायबर शक्ती क्लब, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील नियामक मंडळाचे अध्यक्ष मोरेश्वर भालसिंग, प्राचार्य डॉ.एस.जे. वाघ यांच्या प्रेरणेतून आणि डॉ. प्रियंका शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने सायबर जनजागृतीसाठी कार्यरत आहे.

# आयुष्यात यशस्वी होण्यासाठी शिस्तबद्धपणा महत्वाचा

## निलेश तांबे; यशोदा पॉलिटेक्निकमध्ये 'आरंभ २०२५' चा समारोप

**सातारा/प्रतिनिधी : -**

आयुष्यात यशस्वी होण्यासाठी शिस्तबद्धपणा महत्वाचा असून, एक चांगला अभिव्यक्ती होण्यासाठी अभ्यासासोबतच खेळ आणि व्यायामही महत्वाचा आहे. यशोदा शिक्षण संस्था ही विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असल्याचे प्रतिपादन निलेश तांबे यांनी केले.

यशोदा टेक्निकल कॅम्पस, यशोदा पॉलिटेक्निकमध्ये दि. ८ ऑगस्ट ते १४ ऑगस्ट २०२५ दरम्यान 'आरंभ २०२५' इंडक्शन प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले होते. दि. १४ रोजी कार्यक्रमाचा समारोप सातारा तालुका पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक निलेश तांबे यांच्या प्रमुख उपस्थितित पार पडला. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. निलेश तांबे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी यशोदा शिक्षण प्रसारक




मंडळाचे कुलसचिव श्री. गणेश सुरवसे, यशोदा पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. प्रविण गावडे तसेच पोलिस अधिकारी श्री अमोल मोटे आणि पोलिस अधिकारी श्री प्रविण वायदंडे मुख्य पाहुणे म्हणून उपस्थित होते.

अमोल मोटे यांनी भारताला नशा मुक्त भारत बनवण्याचे महत्वाचे कार्य असून, संस्था अतीशय कटीबद्धतेने ते कार्य करत असल्याचे सांगितले. तसेच व्यसन म्हणजे केवळ अमली पदार्थाचे सेवन नसून, कोणत्याही वाईट गोष्टीच्या जास्त आहारी जाणे म्हणजे व्यसन असल्याचे सांगत सध्या मोबाईल आणि सोशल मिडिया हे युवापिढीसाठी असणारे सर्वात मोठे व भयंकर व्यसन असल्याचे सांगितले.

यशोदा शिक्षण प्रसारक मंडळाचे कुलसचिव श्री. गणेश सुरवसे यांनी भारतामध्ये सर्वात जास्त २७ टक्के युवा असून, आपल्याकडे जगाला बदलण्याची सर्वात मोठी सुवर्ण संधी असल्याचे सांगितले. यशोदा पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. प्रविण गावडे यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी जनरल सायन्स विभागाचे प्रमुख प्रा. रणजीत खांडेकर, सिव्हिल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख प्रा. प्रतीक मतकर, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी विभाग प्रमुख प्रा.सौ. तारा केंजळे, इलेक्ट्रिकलच्या हेड प्रा. भूपाली कुंभार, आर्टिफिशियल इंटेलिजेंस आणि मशिन लर्निंग डिपार्टमेंटच्या विभागप्रमुख स्वाती डोळस तसेच कंप्युटर इंजिनिअरिंगच्या हेड प्रा. गौरी सुतार उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पुनम धुमाळ आणि व्यवस्थापन प्रा. प्रतिक मतकर यांनी केले. मेकॅनिकलचे विभागप्रमुख प्रा. रणजित बसुगडे यांनी आभार मानले.

# श्री मळाईदेवी पतसंस्थेच्या कुसुर शाखेचे उद्घाटन उत्साहात

**कराड/प्रतिनिधी : -**

श्री मळाईदेवी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जखिनवाडी यांच्या कुसुर शाखेचे उद्घाटन मोठ्या उत्साहात पार पडले. हा सोहळा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शेतीमित्र अशोकराव थोरात यांच्या हस्ते संपन्न झाला.

सन १९८७ रोजी अशोकराव थोरात यांनी एका सामाजिक उद्देशाने या संस्थेची स्थापना केली होती. त्यावेळी ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर, लघुउद्योजक, रिक्षाचालक यांना बँकांच्या पारंपरिक व्यवस्थेतून आवश्यक ते आर्थिक सहाय्य मिळत नव्हते. त्यांच्या पतक्षमता निर्माण करून त्यांना आर्थिक बळ देणे हा उद्देश डोळ्यापुढे ठेवून संस्थेने वाटचाल सुरू केली. सुरुवातीला एका छोट्याशा शाखेतून कार्यास सुरुवात झाली; मात्र काळाची गरज ओळखून सन १९९६ पासून शाखा



विस्ताराचा निर्णय घेतला. आज ३९ वर्षांच्या प्रवासात संस्था मुख्य कार्यालयासह एकूण २१ शाखांचे जाळे उभे करण्यात यशस्वी ठरली आहे. यापैकी १७ शाखा स्वमालकीच्या इमारतीत कार्यरत आहेत ही संस्थेची विशेष कामगिरी ठरली आहे.

दि. ३१ जुलै २०२५ अखेर संस्थेकडे एकूण १६६.५८ कोटी ठेवी जमा झाल्या आहेत. संस्थेने आतापर्यंत सभासद व ग्राहकांना मिळून १२६.५२ कोटी रुपयांचे कर्जवाटप केले आहे. तरलतेच्या दृष्टीने ६६ कोटी रुपये मुदतठेवीत गुंतवणूक केली आहे. संस्थेचे वसूल भागभांडवल १२ कोटी २५ लाख असून, १३ कोटी ६८ लाखांपेक्षा जास्त राखीव निधी संस्थेने उभा केला आहे. स्थापनेपासून आजपर्यंत सातत्याने 'अ' वर्ग संपादन करून संस्था सभासदांचा विश्वास संपादन करत आहे. त्याचबरोबर दरवर्षी सभासदांना १० टक्के लाभांश वाटप करण्यात येत आहे. बँकिंग क्षेत्रातील स्पर्धा व आधुनिकता लक्षात घेऊन संस्थेने छएत्रद्ध, ठढत्रद्ध, ठठ कोड अशा सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

याप्रसंगी बोलताना संस्थेचे चेअरमन अजितराव थोरात म्हणाले, सन १९८७ मध्ये लावलेले हे छोटेसे रोपटे आज वटवृक्ष बनले आहे. कुसुर येथील शाखा ही संस्थेच्या प्रगतीतील आणखी एक महत्त्वाची पायरी आहे. सर्व ग्रामस्थांनी संस्थेच्या विविध योजना व सेवा यांचा लाभ घ्यावा.

कार्यक्रमास अध्यक्ष अशोकराव थोरात, चेअरमन अजित थोरात, व्हाईस चेअरमन चंद्रकांत टंकसाळे, माजी चेअरमन सौ. अरुणादेवी पाटील, संचालक, सल्लागार व शाखा समिती सदस्य उपस्थित होते. तसेच माजी नगरसेवक राजू मुल्ला, प्रमोद शिंदे, डॉ.सौ. रूपाली गावडे, बांधकाम सभापती राजेंद्र यादव, शहाजी पाटील, भारत जंत्रे, मानाजी थोरात, अण्णा काशीद, मळाईदेवी शिक्षण संस्थेचे संचालक तुळशीराम शिर्के, आनंदराव पाटील, प्रदीप पाटील, आशिष थोरात, कुसुरचे सरपंच उदयसिंह कदम, यशवंत कराळे यांच्यासह पंचक्रोशीतील मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना सौ. शर्मिला श्रीखंडे यांनी केले.

# प्रजापिता ब्रह्माकुमारीज आणि लायन्स क्लबच्या वतीने शुक्रवारी रक्तदान शिबिराचे आयोजन

**कराड/प्रतिनिधी:**

प्रजापिता ब्रह्माकुमारीज ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या कराड सेवाकेंद्र व सर्व उपसेवा केंद्र शाखेच्या वतीने आणि लायन्स ऑफ क्लब काम कराडच्या सहकार्याने दिनांक २२ ऑगस्ट रोजी भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. हे शिबिर सकाळी १० ते ५ या वेळेत आहे. आदरणीय पी डी पाटील उद्यान नजीक बनपुरीकर कॉलनी येथील सेवाकेंद्र प्रजापिता ब्रह्माकुमारीज सदभावना भवन कराड येथे होणार आहे. यशवंतराव चव्हाण ब्लड बँकेच्या वतीने या शिबिरात तांत्रिक सहकार्य केले जाणार आहे.

कराड शहर आणि परिसरातील माता,भगिनी,बंधू ,युवा यांनी या पुण्य कार्यामध्ये आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन सेवाकेंद्राच्या मुख्य संचालिका बी के उषा दीदी आणि लायन्स क्लब ऑफ कराडचे अध्यक्ष सतीश मोरे यांनी केले आहे.

प्रजापिता ब्रह्माकुमारीज ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या सामाजिक सेवा प्रभागातर्फे ब्रह्माकुमारीज संस्थेच्या पुर्वव्रत मुख्य प्रशासिका राजयोगिनी दादी प्रकाशमणीजी यांच्या १८ व्या पुण्यतिथी निमित्त विश्वबंधुत्व दिवसाच्या निमित्ताने राष्ट्रीय रक्तदान महा अभियान आयोजित करण्यात येत आहे. भारतामध्ये असलेल्या सहा हजार पेक्षा अधिक सेवाकेंद्रावर एकाच वेळी २२ ऑगस्ट ते २५ ऑगस्ट दरम्यान विशाल रक्तदान शिबिर आयोजित करण्यात येत आहे.

आपण सर्वजण जाणतो की, स्वैच्छिक रक्तदान ही एक जीवन रक्षक सेवा आहे. अनेकांचे जीवन यामुळे वाचते,ही फक्त हॉस्पिटलमध्ये निरंतर रक्ताची पूर्तता करण्यास सहायक नाही तर तरुण पिढीमध्ये रक्तदानाची सामाजिक भावना वाढविणारी प्रक्रिया आहे. सर्वांनी या शिबिरात सहभागी व्हावे, रक्तदान करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

Free Registration link- bksocialwing.org. संपर्कासाठी नंबर ९५६१९३०५२६, नाव-उषा दिदी ९९२१९८३३८७, नाव + ९१९४२२६०३३११ विराग

# रोहन कोळेकरची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**इस्लामपूर/प्रतिनिधी:**

कासेगांव शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, पेठ चा विद्यार्थी रोहन कोळेकर याने सांगली जिल्हा थलेटिक्स असोसिएशनच्या वतीने घेण्यात आलेल्या १८ वर्ष वयोगटाखालील उंच उडी या क्रीडा प्रकारात जिल्हा स्तरावर द्वितीय क्रमांक पटकावला.

त्याची पुणे बालेवाडी येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.त्या बद्दल त्याचा पालकां समवेत तसेच मार्गदर्शक क्रीडा शिक्षक आर पी मोहिते, एस.पी.डबाणे यांचा सत्कार मुख्याध्यापक एस.बी.माने यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी पालक राहुल कोळेकर, पल्लवी कोळेकर, जयश्री शेळके, अर्चना ढवळीकर, उमा ठाणेकर, वर्षाराणी बंडगर, शिला माळी, एस.पी.डबाणे,



पेठ ता वाळवा येथील न्यू इंग्लिश स्कूल चा रोहन कोळेकर याची सत्कार करताना मुख्याध्यापक एस.बी.माने, आर.पी.मोहिते, एस.पी.डबाणे, समवेत, पालक राहूल व पल्लवी कोळेकर.

एम.व्ही भोपळे, मनीषा पाटील, भाग्यश्री पवार, सरस्वती कदम, भारती गावित, नलिनी पाटील, रोहन जाधव, धनंजय बामणे, चंद्रकांत खाडे, गुंडा जाधव, संग्राम पाटील यांसह विद्यार्थी उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक एन.डी. पाटील यांनी केले. पी.एस.गावडे यांनी आभार मानले.

# तिरंग्यासोबत व्यसनमुक्तीचा नारा;माळेगावात विद्यार्थ्यांची प्रेरणादायी रॅली

**बारामती/प्रतिनिधी:**

स्वातंत्र्य फक्त साखळ्या तोडण्यात नाही, तर समाजाला घातक असलेल्या व्यसनांच्या बेड्यांतून मुक्त करण्यात आहे हा प्रभावी संदेश माळेगावातील विद्यार्थ्यांनी १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी दिला. माळेगाव पोलीस ठाणे व श्रीमंत शंभू सिंह महाराज हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने व्यसनमुक्ती जागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. संपूर्ण गावातून तिरंगा झेंडा घेऊन, घोषणांचा जयघोष करीत निघालेली ही रॅली नागरिकांना भुरळ घालणारी ठरली.

या रॅलीमध्ये शाळेतील एनसीसी, आरएसपीचे विद्यार्थी तसेच शेकडो विद्यार्थी-विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त



सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांच्या हातात फडकणारे तिरंगे आणि त्यांच्या ओठांवरून उमटणारे व्यसनमुक्तीचे नारे पाहून नागरिक भारावून गेले. दारू, गुटखा सोडा - आयुष्य सुंदर करा, व्यसनमुक्त भारत घडवा, असे घोषवाक्ये संपूर्ण परिसरात गुंजली.

या उपक्रमाचे प्रमुख आयोजन माळेगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन लोखंडे यांनी केले. तर श्रीमंत शंभू सिंह महाराज हायस्कूल व जुनिअर कॉलेजचे शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांनी या उपक्रमाला मोठे सहकार्य केले. रॅलीच्या यशस्वीतेसाठी पोलिस विभागाने कंबर कसली होती. यावेळी माळेगाव पोलीस ठाण्याचे गोपनीय विभाग प्रमुख ज्ञानेश्वर सानप, पोलीस शिपाई जयसिंग कचरे, अमोल कोकरे उपस्थित होते.

या प्रसंगी मार्गदर्शन करताना सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन लोखंडे म्हणाले, व्यसन म्हणजे गुलामीची साखळी आहे. जी व्यक्ती व्यसनात अडकते ती केवळ स्वतःचेच नव्हे तर कुटुंबाचे आयुष्य उद्ध्वस्त करते. अशा बेड्यांतून सुटका करणे हेच खरे स्वातंत्र्य आहे. आज विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीचा जो निर्धार दाखवला आहे, तो उद्या संपूर्ण समाजासाठी आदर्श ठरेल.

रॅली दरम्यान विद्यार्थ्यांचा उत्साह, पोलिसांचा सजग सहभाग आणि नागरिकांची सकारात्मक प्रतिक्रिया यामुळे संपूर्ण माळेगाव शहरात एक वेगळीच ऊर्जा निर्माण झाली. रॅलीमुळे समाजामध्ये एक संदेश पसरला की, स्वातंत्र्याचा खरा आनंद घ्यायचा असेल तर व्यसनमुक्त जीवनशैली अंगीकारावी लागेल.

या रॅलीमुळे केवळ माळेगावच नव्हे तर इतर गावेही व्यसनमुक्तीच्या दिशेने ठोस कृती करतील आणि खऱ्या अर्थाने स्वातंत्र्याचा आनंद उपभोगतील, असा ठाम विश्वास सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन लोखंडे यांनी व्यक्त केला.

# आम्ही चाफळकर फाउंडेशनच्या वतीने पुरस्कारांचे वितरण

**चरेगाव/प्रतिनिधी : -**

चाफळ, ता. पाटण येथील आम्ही चाफळकर फाउंडेशनच्या वतीने १५ ऑगस्टदिनी आयोजित केलेल्या विद्यार्थी गुणगौरव समारंभात जाळगेवाडीचे सुपुत्र, जाळगेवाडी कर फाउंडेशनचे संस्थापक, अध्यक्ष चंद्रकांत धोंडीराम साळुंखे यांनी पोलीस दलातून निवृत्त झाल्यानंतर पर्यावरण रक्षणासाठी समर्पक भावनेने वृक्षारोपण, तसेच वृक्ष संवर्धनाबाबत केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पर्यावरण रत्न पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

तसेच सामाजिक कार्यकर्ते संदीप बाजीराव साळुंखे यांना आम्ही चाफळकर फाउंडेशनच्या माध्यमातून मी समाजाचा समाज माझा या उदात्त भावनेतून चाफळ विभागात शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, आरोग्य, पर्यावरण, प्रबोधन या क्षेत्रात



संस्थेचे संचालक या नात्याने दिलेल्या भरीव योगदानाबद्दल सन २०२५ चा आदर्श सदस्य पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

सदर पुरस्कार वितरण समारंभास आम्ही चाफळकर फाउंडेशनचे अध्यक्ष विनायक देशमुख, मोहन बोबडे, बाळकृष्ण बहुलेकर, दत्ता वेदपाठक, मनोहर माने, संदीप साळुंखे, संभाजीराव देशमुख, एल.एस. बाबर, रामानंद वाचनालयाचे अध्यक्ष दत्तात्रय सुतार, श्री समर्थ विद्यामंदिर चाफळ, जिल्हा परिषद शाळा व अंगणवाडीचे सर्व शिक्षक विद्यार्थी तसेच समस्त चाफळकर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या पुरस्कारांबद्दल दोन्ही साळुंखे बंधूंचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# शिवाजीनगरच्या सरपंच सौ सुरेखा पवार यांनी जपली सामाजिक बांधिलकी

## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे केले वाटप

**चरेगाव/प्रतिनिधी:**

शिवाजीनगर(मांगवाडी),ता.कराड गावच्या सरपंच सौ सुरेखा सचिन पवार तसेच त्यांचे पती सामाजिक कार्यकर्ते श्री सचिन उत्तम पवार यांनी सामाजिक बांधिलकी जपत येथील अंगणवाडीच्या तसेच जिल्हा परिषद शाळेच्या पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना वर्षभर पुरेल एवढ्या वह्या, पुस्तके, पेन आदी शैक्षणिक साहित्याचे वाटप नुकतेच केले. पवार दाम्पत्य परिसरामध्ये सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणारे दाम्पत्य आहे.



शिवाजीनगर: येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करताना पवार दाम्पत्य(छाया-रघुनाथ थोरात)

आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो या व्यापक विचारातून, उदात्त भावनेतून शिक्षणाचे महत्त्व ओळखून पवार दांपत्याने शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केल्याचे यावेळी पवार दांपत्याने सांगितले. या सामाजिक बांधिलकीचे कौतुक परिसरातून होत आहे.

यावेळी मुख्याध्यापिका मोहिते मॅडम, गायकवाड मॅडम , अंगणवाडी सेविका दिपाली पवार, ग्रा प सदस्य विक्रम साळुंखे, समाधान बोरगे, शाळा व्यवस्थापनचे अध्यक्ष अभिजीत साळुंखे, उपाध्यक्ष सोमार्डे, तंटामुक्तीचे अध्यक्ष सुनील पवार, समाजिक कार्यकर्ते सचिन पवार, समाधान पवार, संदीप पवार, दिनकर भोंडगे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सुहास माने यांचे निधन

**इस्लामपूर/प्रतिनिधी : -**



कासेगाव, ता. वाळवा येथील सुहास मानाजी माने (वय ५२) यांचे हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुली, मुलगा असा परिवार आहे. ते परिसरात सुहास मिस्त्री नावाने परिचित होते. रक्षाविसर्जन शुक्रवार, दि. २२ रोजी सकाळी १० वाजता कासेगाव येथे होणार आहे.

# विलास शंकर भिंगार्डे (मेहरबान) यांचे निधन

**इस्लामपूर/प्रतिनिधी:**



इस्लामपूर (हनुमाननगर) येथील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते विलास शंकर भिंगार्डे (वय ८० वर्षे) यांचे वार्धक्याने निधन झाले. ते राज्यातील नंदीवाले समाजाचे पंच, माजी मंत्री आ.जयंतराव पाटील यांचे कट्टर समर्थक होते. ते मेहरबान म्हणून सर्वांना परिचित होते.

त्यांच्या पश्चात पत्नी,विवाहित तीन मुलगे, एक मुलगी,सुना,नातवंडे असा परिवार आहे. रक्षा विसर्जन व कार्यविधी शुक्रवार दि.२२ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९.३० वा. इस्लामपूर येथील कापूसखेड नाका स्मशान भूमीत होणार आहे. नंदीवाले समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष मोहन भिंगार्डे यांचे ते वडील,तर युवा कार्यकर्ते धनाजी देशमुख यांचे आजोबा होत.



उरूण इस्लामपूर येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन करताना राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष शहाजी पाटील, अरुणादेवी पाटील, पुष्पलता खरात,कमल पाटील, सुभाषराव सुर्यवंशी, दादासाहेब पाटील, तसेच महिला व युवक कार्यकर्ते.

# उरूण इस्लामपूर येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन

**इस्लामपूर/ प्रतिनिधी:**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या २३० व्या पुण्यतिथीनिमित्त उरूण इस्लामपूर येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने पक्ष कार्यालयात अभिवादन करण्यात आले. प्रारंभी शहर महिला सदस्या अंजना चव्हाण यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी घालून दिलेल्या नीती मूल्यांचा आपल्या जीवनात अंगीकार करावा. जेंव्हा महिलांना संधी मिळते, त्यावेळी त्या संधीचे सोने कसे करतात? याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे

अहिल्यादेवी आहेत,अशी भावना शहराध्यक्ष शहाजीबापू पाटील, माजी नगराध्यक्षा अरुणा देवी पाटील, महिला शहराध्यक्षा पुष्पलता खरात, राजारामबापू सहकारी बँकेच्या संचालिका कमल पाटील यांनी व्यक्त केल्या. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष सुभाषराव सुर्यवंशी,माजी उपनगराध्यक्ष दादासाहेब पाटील, प्रतिभा पाटील, सुनंदा साठे, जयश्री चव्हाण, रविंद्र वाघमोडे, परेश पाटील, संजय जाधव, शकील जमादार, प्रमोद जाधव, धनंजय पाटील, अमोल पाटील, सुहास पाटील, सुधीर पाटील यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# राहत्या घरी गळफास घेवून एकाची आत्महत्या

**सातारा/प्रतिनिधी:**

राहत्या घरी गळफास घेवून एकाने आत्महत्या केल्याची नोंद सातारा तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, सुमीत यशवंत भोसले (वय ३३, रा. म्हसवे ता.सातारा) या युवकाने गळफास घेवून आत्महत्या केली. ही घटना दि. १८ ऑगस्ट घडली आहे. सातारा तालुका पोलीस ठाण्यात याची नोंद झाली आहे. अधिक तपास सहाय्यक फौजदार माने करीत आहेत.


**सदर शुंभाक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे कृपया दुरुपयोग करु नये.**

## नशिबाची परीक्षा

गुरुवार २१ ऑगस्ट २०२५

### मिलनम डे

उदय-अस्त | सिंगल ८-२-५ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 170 189 116 | 8 - 4 | 158 149 112 | 80-34-92-51-46 |

### कल्याणम

उदय-अस्त | सिंगल २-३-७ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 129 480 660 | 2 - 6 | 150 169 114 | 24-06-13-75-68 |

### मुंबैम (मेन )

उदय-अस्त | सिंगल ६-४-१ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 123 268 330 | 6 - 8 | 125 260 440 | 63-08-45-17-89 |

दिवाळी बंपर चान्सू तयार आहे संपर्क क्रमांक मो.नं. ९९७५४७९८२६

## आज का अंदाज

**गुरुवार दिनांक २१ ऑगस्ट २०२५**

| कल्याण बाजार 'पत्थर फोड एकच' | मुंबई बाजार 'पत्थर फोड एकच' |
|---|---|
| २ - ५ - ६ - ९ | ३ - ४ - ५ - ८ |
| ३९०-४४७-११४-२३४ | १४८-२६६-१६८-१८९ |
| ४८०-३६६-२७७-४५० | ३४६-६९९-३४८-३७८ |
| ५७०-२४९-३३०-६६७ | ५८०-७७०-७८०-२२४ |
| जोडी | जोडी |
| २४ -५४ - ६१ - ९१ | ३२ -४२ - ५१ - ८१ |
| २८ -५८ - ६३ - ९३ | ३६ -४६ - ५७ - ८७ |
| २० -५० - ६७ - ९७ | ३० -४० - ५९ - ८९ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस २१-२२ ऑगस्ट

प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

**गुरुवार दिनांक २१ ऑगस्ट २०२५**

| सर्व बाजार साठी | | | | |
|---|---|---|---|---|
| | १० - | २० - | ५४ - | ८४ |
| | १९ - | २९ - | ५६ - | ८६ |
| | १७ - | २७ - | ५३ - | ८३ |
| | ६७८ - | १५६ - | ११३ - | १७० |
| | ३४४ - | २३७ - | २६७ - | ३६९ |
| | २९० - | ५७० - | ३३९ - | ५६७ |

टिप- कल्याण व मुंबई करिता व सर्व बाजारासाठी ६० पानाचा चार्ट मिळेल १००% खात्रीशीर फक्त सोमवारी मिळेल

प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

# भाजपचे युवा नेते वैभव दादा पाटील यांच्या प्रयत्नाला यश

## पालकमंत्र्यांच्या आदेशानंतर विटा आगारातील रस्त्याचे काम सुरू;पालकमंत्र्यांचे मानले आभार



**विटा/प्रतिनिधी:**

खानापूर तालुक्यातील विटा शहरातील विटा आगार डेपोचे नवीन बस स्थानक बनवण्याचे काम जवळपास एक वर्षे झाले सुरू आहे. परंतु जुने विटा बस स्थानक पाडत असताना प्रवाशांच्या बाबत कुठली सुविधा उपलब्ध किंवा प्रवाशांच्यासाठी कोणती न करता जुने बस स्थानक पाडून नव्या बस स्थानकाचे काम गेले वर्षभर सुरू आहे. विटा बस स्थानक बाबत प्रवासी व नागरिकांतून तीव्र नाराजी दिसून येत होती. तसेच लवकरच आपण विटा बस स्थानक या संदर्भात पालकमंत्री यांचे भेट घेणार असल्याचेही सांगितले होते. त्या अनुषंगाने विटा बस स्थानक संदर्भात गैरसोय लक्षात घेता भाजपचे युवा नेते वैभव दादा पाटील यांनी विटा बस स्थानकातील गैरसोईवर मार्ग काढण्यासाठी सांगली जिल्ह्याचे पालक मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांची भेट घेऊन सविस्तर विटा बस स्थानक बाबत निवेदन देत सविस्तर परिस्थिती निवेदनाच्या माध्यमातून पालकमंत्री यांना दाखवले ड. वैभव पाटील यांच्या आक्रमक भूमिके नंतर विटा आगार डेपो खडबडून जागे झाले तर दुसरीकडे वैभव दादा पाटील यांनी पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांना निवेदन दिल्यानंतर तातडीने पालकमंत्री यांनी वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी यांना आदेश दिला आणि विटा आगारातील रस्त्याचे काम सुरू झाले आहे.

विटा बसस्थानकबाबत अनेक तक्रारी शालेय कॉलेज विद्यार्थी व प्रवासी यांनी भाजपचे युवा नेते वैभव दादा पाटील यांच्याकडे गेल्या होत्या. यावेळी वैभव दादा पाटील यांनी थेट विटा बस स्थानककडे कार्यकर्त्यांसह आल्यानंतर त्यांनी थेट विटा आगार डेपो चे डेपो मॅनेजर यांना चांगलेच धारेवर धरले. सध्या पावसाळा सुरू असून प्रवाशांना थांबायला कोणती सुविधा नाही निवारा नाही. शिवाय बस स्थानक परिसरात सर्वत्र खड्डे पडलेत. येणाऱ्या प्रवाशांना बाकड्यांची सुद्धा व्यवस्था केली नाही. असे म्हणत विटा बस स्थानकातील प्रवाशांची गैरसोय तातडीने थांबवावी, अशा वैभव दादा पाटील यांनी डेपो मॅनेजर यांना यासंदर्भात सूचना दिल्या होत्या.

तसेच लवकरच आपण विटा बस स्थानक या संदर्भात पालकमंत्री यांचे भेट घेणार असल्याचेही सांगितले होते. त्या अनुषंगाने विटा बस स्थानक संदर्भात गैरसोय लक्षात घेता भाजपचे युवा नेते वैभव दादा पाटील यांनी विटा बस स्थानकातील गैरसोयीवर मार्ग काढण्यासाठी सांगली जिल्ह्याचे पालक मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांची भेट घेऊन सविस्तर विटा बस स्थानक बाबत निवेदन देत सविस्तर परिस्थिती निवेदनाच्या माध्यमातून पालकमंत्री यांना दाखवले. ड. वैभव पाटील यांच्या आक्रमक भूमिके नंतर विटा आगार डेपो खडबडून जागे झाले तर दुसरीकडे वैभव दादा पाटील यांनी पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांना निवेदन दिल्यानंतर तातडीने पालकमंत्री यांनी वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी यांना आदेश दिला आणि विटा आगारातील रस्त्याचे काम सुरू झाले.



एस. आर. नं. ०५/२०२४

### खाजगी क्षेत्रातील जमिन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदीपद्धतीने ताब्यात घेणेबाबत

# जाहीर नोटीस

मौजे शहापूर, ता.जि. सातारा या पंचक्रोशीतील तमाम लोकांना, पतसंस्था, वित्तीय संस्था, सरकारी कार्यालये व निमसरकारी कार्यालये यांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते कि, मा. कार्यकारी अभियंता उरमोडी धरण विभाग सातारा, जि. सातारा हे मौजे शहापूर, ता.जि. सातारा येथील खाली नमूद २ हे. ६३.२५ आर क्षेत्र महाराष्ट्र शासनास उरमोडी डावा कालवा या सार्वजनिक प्रयोजनाकरीता महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण क्र. एलक्यूएन /२०१७ प्र.क्र. १२/अ २ मंत्रालय मुंबई दिनांक २५/०१/२०१७ मधील तरतुदीस अनुसरून खाजगी क्षेत्रातील जमिन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पद्धतीने मा. कार्यकारी अभियंता उरमोडी धरण विभाग सातारा, जि. सातारा यांचे नावे होण्याबाबतचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी सो सातारा यांचेकडे सादर करत आहे.

आणि ज्या अर्थी मा. जिल्हाधिकारी कार्यालय सातारा (भूसंपादन शाखा) यांचेकडील आदेश क्र. भूसं/एसआर-/कावि-१४/२४ दिनांक ०४/०३/२०२४ अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी उक्त शासन निर्णय दिनांक २५/०१/२०१७ आणि तद्नुषंगिक शासन निर्णयतसेच शासन परिपत्रक प्रमाणे कार्यवाही महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण क्र. एलक्यूएन ०१/२०१७ प्र.क्र. १२/अ २ मंत्रालय मुंबई दिनांक २५/०१/२०१७ प्रमाणे कार्यवाही करणेबाबत निर्देश प्राप्त आहेत. आणि ज्याअर्थी मा. कार्यकारी अभियंता उरमोडी धरण विभाग सातारा, जि. सातारा यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र. उधवि/भूसं/का-५/२२२/सन २०२४ दिनांक १९/०१/२०२४ अन्वये प्रस्ताव उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. २१) सातारा यांचे कार्यालयाकडे सादर केला आहे.

त्याअर्थी आता उक्त शासन निर्णय व शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार याद्वारे

(१) अनुसूची-एक मध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमिनी खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने उरमोडी प्रकल्पाच्या उरमोडी डावा कालवा याकामी मा. कार्यकारी अभियंता उरमोडी धरण विभाग सातारा जि. सातारा यांचे नावे करणेच्या अनुषंगाने जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे आणि

(२) अनुसूची-एक मधील स्तंभ ४ मध्ये नमूद संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमिन खाजगी वाटाघाटीद्वारे उरमोडी प्रकल्पाच्या उरमोडी डावा कालवा याकामी शहापूर, ता. जि. सातारा येथील जमिनी मा. कार्यकारी अभियंता उरमोडी धरण विभाग सातारा जि. सातारा यांचे नावे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीपत्रे (विकल्प) मागवीत आहे.

(३) प्रकल्पासाठी जमिन थेट खरेदी घेताना जिल्हास्तरीय समितीमार्फत भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याच्या आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम-२०१३ मधील कलम २६ ते ३० च्या व शेड्युल १ च्या तरतुदीनुसार संबंधित जमिनीसाठी परिगणित होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रकमेवर २५ टक्के रक्कम वाढीव देवून मोबदला निश्चित करण्यात येईल.

(४) संबंधित भूधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर विहीत नमुन्यातील संमतीपत्रे (विकल्प) तसेच उपरोक्त बाबत कोणाचीही काहीही हरकत असल्यास तशी लेखी हरकत आवश्यक त्या कागदपत्रांसह उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. २१ (कृष्णा खोरे) भूसंपादन भवन सातारा यांचेकडे समक्ष ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत कार्यालयीन वेळेत दाखल करावीत.

(५) संमतीपत्र (विकल्प) विहीत नमुना उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. २१ (कृष्णा खोरे) भूसंपादन भवन सातारा / मा. कार्यकारी अभियंता उरमोडी धरण विभाग सातारा जि. सातारा यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालयामार्फत/उरमोडी प्रकल्पाच्या धोम डावा कालवा उपविभाग क्र. ६ कोरेगांव च्या प्राधिकृत अधिकाऱ्यामार्फत भूधारकांस उपलब्ध करून देणेत येईल.

(६) सदर प्रकल्पासाठी निश्चित करणेत आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. २१) सातारा / मा. कार्यकारी अभियंता उरमोडी धरण विभाग सातारा जि. सातारा यांचे कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना/हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवणेत आली आहे.

### परिशिष्ट-१
### अनुसूची-१
### संपादनाच्या क्षेत्राच्या खरेदी घ्यावयाच्या जमिनींचा तपशिल मौजे शहापूर, ता. जि. सातारा

| अ.क्र. | गट/सर्वे क्र. | गा. न. नं. ७/१२ प्रमाणे एकूण क्षेत्र (हे.आर) | खरेदी करावयाचे क्षेत्र (हे.आर) | भूधारकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | ३३/१ | १.०९<br>०.२८<br>एकूण-१.३७ | ०.१६५० | श्री बहुलेश्वर देव |
| २ | ३३/५ | ०.१७ | ०.०७ | श्री बहुलेश्वर देव |
| ३ | ३३/३ | ०.१३ | ०.००.२५ | श्री बहुलेश्वर देव |
| ४ | ३९/४ | ०.२२ | ०.०७ | नंदा बाळकृष्ण माने, सुमित बाळकृष्ण माने, सुरज बाळकृष्ण माने, शंकर सिदु माने, जोतीबा महादेव माने |
| ५ | ३९/१० | ०.२० | ०.१६५० | शंकर रंगु माने, हिंदुराव सर्जेराव माने, सुर्यकांत सर्जेराव माने, पृथ्वीराज सर्जेराव माने, रविंद्र अनंत माने, धीरज चंद्रकांत माने, सुरज चंद्रकांत माने |
| ६ | ३९/१२ | ०.६८ | ०.०६५० | रमेश रामचंद्र माने, बबन रामचंद्र माने, संस्कृती गुलाब माने, सोहम गुलाब माने, सारीका गुलाब माने, शंकर जनार्दन माने, दिक्षा दिनकर माने अ.पा.क. आई प्रतिक्षा दिनकर माने, प्रतिक्षा दिनकर माने, प्रथमेश दिनकर माने अ.पा.क. आई प्रतिक्षा दिनकर माने, सिंधुताई चंद्रकांत माने, राजेंद्र चंद्रकांत माने, संजय चंद्रकांत माने, रोहिणी सुनिल गायकवाड, मालन माणिक निकम, हणमंत शिवराम माने |
| ७ | ४२ | ०.९६ | ०.१४ | श्री बहुलेश्वर देव |
| ८ | १८/१ | ०.३३ | ०.०२ | रामचंद्र लक्ष्मण शिंदे, अंकुश लक्ष्मण शिंदे, निलम विष्णू शिंदे, गौरव विष्णू शिंदे, सुनंदा हणमत पोळ, चंद्रभागा बाळकृष्ण गोडसे, छाया चंद्रकांत शिंदे |
| ९ | १७ | १.७३ | ०.०२ | मनिषा चंद्रकांत जाधव, यशोदा वामन माने, विनोद वामन माने, सर्जेराव बाजीराव माने, भगवान बाजीराव माने |
| १० | ४३/१ | २.५३ | ०.२८ | श्री बहुलेश्वर देव |
| ११ | ४३/३/अ | ०.१९ | ०.०३ | श्री बहुलेश्वर देव |
| १२ | ४३/३/ब | ०.१७ | ०.०५ | श्री बहुलेश्वर देव |
| १३ | ४३/३/क | ०.१८ | ०.०१ | श्री बहुलेश्वर देव |
| १४ | ४३/४/२ | ०.१६ | ०.११ | श्री बहुलेश्वर देव |
| १५ | ४३/४/३ | ०.१६ | ०.०६५० | श्री बहुलेश्वर देव |
| १६ | ४३/४/९ | ०.६०<br>०.१२<br>एकूण-०.७२ | ०.१० | श्री बहुलेश्वर देव |
| १७ | ४४ | ०.४९ | ०.०१ | गणपत सिताराम माने ए.कु.मॅ., नलिनी मधुकर माने, नितीन मधुकर माने, विजय मधुकर माने, शिवाजी कोंडीबा माने, तानाजी कोंडीबा माने, भानुदास कोंडीबा माने, रोहीदास कोंडीबा माने अ.पा.क. आई कमल कोंडीबा माने, नंदा कोंडीबा माने, माया सचिन निंबाळकर, कमल जोतीराम माने, अजय जोतीराम माने |
| १८ | ४७/१ | ०.५३ | ०.१ | रामचंद्र शिवाजी देवकर, सुर्याजी शिवाजी देवकर, सावित्रा शिवाजी देवकर, जयवंत शिवाजी देवकर, सागर बाजीराव देवकर अ.पा.क. आई संजिवनी बाजीराव देवकर, वैशाली शिवाजीराव सुर्यवंशी, पार्वती बाजीराव देवकर, विजया सुर्यकांत माने, सागर बाजीराव देवकर, सरीता विशाल निकम, दत्तात्रय शंकर देवकर ए.कु. मॅ., भिमराव मानसिंग देवकर, सुमल मानसिंग देवकर, अमोल महादेव देवकर, हरिश्चंद्र महादेव देवकर, रविंद्र महादेव देवकर, सिमा महादेव देवकर, हणमंत अंकुश माने, छाया दिलीप मतकर, विजय विष्णू देवकर, आनंदा विष्णू देवकर, माया किसन जाधव, कल्पना सदाशिव घाडगे, विद्या कैलास बोकडे, सरिता |
| | | | | विष्णू देवकर, मंदा विष्णू देवकर, मालन विठ्ठल माने, हिंदुराव दिनकर देवकर, मनोहर दिनकर देवकर, धनाजी दिनकर देवकर, पार्वती बाजीराव देवकर |
| १९ | ४७/३ | ०.२० | ०.०४ | रामचंद्र शिवाजी देवकर, सुर्याजी शिवाजी देवकर, सावित्रा शिवाजी देवकर, जयवंत शिवाजी देवकर, विजया सुर्यकांत माने, वैशाली शिवाजीराव सुर्यवंशी, सागर बाजीराव देवकर अ.पा.क. आई संजिवनी बाजीराव देवकर, सरीता बाजीराव देवकर अ.पा.क. आई संजिवनी बाजीराव देवकर, पार्वती बाजीराव देवकर, सागर बाजीराव देवकर, सरीता विशाल निकम, दत्तात्रय शंकर देवकर ए.कु. मॅ., विजय विष्णू देवकर, आनंदा विष्णू देवकर, मालन विठ्ठल माने, माया किसन जाधव, कल्पना सदाशिव घाडगे, विद्या कैलास बोकडे, सरीता विष्णू देवकर, नंदा विष्णू देवकर, महादेव मानसिंग देवकर ए. कु. मॅ., हिंदुराव दिनकर देवकर मनोहर दिनकर देवकर, धनाजी दिनकर देवकर, कल्पना हणमंत पोतेकर, पुष्पा श्रीमंत मोरे, सागर बाजीराव देवकर, विजया सुर्यकांत माने, वैशाली शिवाजीराव सुर्यवंशी, सरीता विशाल निकम |
| २० | ४७/४ | ०.१९ | ०.०५५० | रामचंद्र शिवाजी देवकर, सुर्याजी शिवाजी देवकर, जयवंत शिवाजी देवकर, सावित्रा शिवाजी देवकर, सरीता बाजीराव देवकर अ.पा.क. आई संजिवनी बाजीराव देवकर, सागर बाजीराव देवकर अ.पा.क. आई संजिवनी बाजीराव देवकर, वैशाली शिवाजीराव सुर्यवंशी, विजया सुर्यकांत माने, पार्वती बाजीराव देवकर, सागर बाजीराव देवकर, सरीता विशाल निकम, दत्तात्रय शंकर देवकर ए.कु.मॅ. |
| २१ | ४७/५ | ०.४० | ०.०६ | रामचंद्र शिवाजी देवकर, सुर्याजी शिवाजी देवकर, जयवंत शिवाजी देवकर, सावित्रा शिवाजी देवकर, सागर बाजीराव देवकर अ.पा.क. आई संजिवनी बाजीराव देवकर, वैशाली शिवाजीराव सुर्यवंशी, विजया सुर्यकांत माने, सरीता बाजीराव देवकर अ.पा.क. आई संजिवनी बाजीराव देवकर, पार्वती बाजीराव देवकर, सागर बाजीराव देवकर, सरीता विशाल निकम, दत्तात्रय शंकर देवकर ए.कु. मॅ. |
| २२ | ४८/१ | ०.४७ | ०.०१५० | जोतीराम गोपाळा भोसले |
| २३ | ४८/३ | ०.४९ | ०.११ | भिमराव मानसिंग देवकर, सुमल मानसिंग देवकर, अमोल महादेव देवकर, हरिश्चंद्र महादेव देवकर, रविंद्र महादेव देवकर, सिमा महादेव देवकर, विद्या कैलास बोकडे, सरीता विष्णू देवकर, नंदा विष्णू देवकर, आनंदा विष्णू देवकर, कल्पना सदाशिव घाडगे, माया किसन जाधव, मालन विठ्ठल माने, विजय विष्णु देवकर, धनाजी दिनकर देवकर, मनोहर दिनकर देवकर, हिंदुराव दिनकर देवकर |
| २४ | ४८/५ | ०.६४<br>०.११<br>एकुण-०.७५ | ०.०५ | चंद्रकांत हणमंत माने, रमेश हणमंत माने, जयश्री ज्ञानदेव घोरपडे, सुरेखा सुधाकर पोतेकर, बजरंग एकनाथ माने, संदीप एकनाथ माने, भिकाजी संपत माने,सुरेश संपत माने, बाळूताई निवृत्ती माने, दत्तात्रय निवृत्ती माने, विनायक कृष्णा माने, बाळासाहेब यशवंत माने, जानकाबाई शंकर कदम, गंगुबाई यशवंत माने, ईश्वर धनंजय माने, बानंदी धनंजय माने, विद्या संजय गोरे, अमित आदिनाथ माने, रूपाली कल्याण रसाळ, शितल दिगंबर नलवडे, शारदा आदिनाथ माने, संध्या मनोहर भोसले, रेश्मा सुरेश भासल, शशिकला सुनिल माने |
| २५ | ४८/६ | ०.३३ | ०.२४ | शिवनाथ काशिनाथ माने, विजय काशिनाथ माने, निर्मला शंकर चव्हाण, वंदना लक्ष्मण गायकवाड, ताराबाई काशिनाथ माने, छाया जयवंत माने, केदार जयवंत माने अ.पा.क. आई छाया जयवंत माने, पायल जयवंत माने अ.पा.क. आई छाया जयवंत माने, गौरी बाळकृष्ण माने अ.पा.क. आई सुनिता बाळकृष्ण माने, तानुबाई भिकू माने, प्रभाकर भिकू माने, भारती रामचंद्र देशमुख, शांताबाई दशरथ बाणवडे, संगिता बाळकृष्ण माने, सिताबाई हणमंत जगताप, सुनिता बाळकृष्ण माने, फुलाबाई मुरलीधर माने, शंकर लक्ष्मण माने, राजाराम लक्ष्मण माने, राधाबाई सयाजी माने, जनार्दन सयाजी माने, रूक्मिणी रविंद्र यादव, पद्मा दिपक माने |
| २६ | ५१/४ | ०.२४ | ०.११ | श्री वेताळ देव |
| २७ | ५५ | ०.१८ | ०.००५० | राजेंद्र रामचंद्र माने, संजय नवनाथ माने, स्वाती विक्रम माने, आशा नवनाथ माने, अंजना माणिक निकम, रंजना राजेंद्र राजेंद्र गायकवाड, लक्ष्मी रामचंद्र माने |
| २८ | ५४/३ | ०.७९ | ०.१२ | सचिन प्रल्हाद भोसले, राजेश प्रल्हाद भोसले, मनिषा दिलीप गायकवाड, सुनिता प्रल्हाद भोसले, किरण बाळकृष्ण भोसले, निलम संजीव पवार, रूपाली रोहिदास राजपुरे, सुवर्णा बाळकृष्ण भोसले |
| २९ | ५८/१ | ०.४५ | ०.०९ | गोविंद तानाजी माने, शिवाजी तानाजी माने, मीराबाई तानाजी ताटे, तारूबाई शंकर जाधव, सिताबाई मनोहर बागल, उज्वला भरत माने, कमल लक्ष्मण माने, पार्वती महादेव जाधव, वंदना भरत माने, वैभव भरत माने |
| ३० | ५८/२ | ०.४६ | ०.०८ | जयवंत शिवाजी देवकर, रामचंद्र शिवाजी देवकर, सावित्रा शिवाजी देवकर, सुर्याजी शिवाजी देवकर, शहाजी सिताराम भोसले, कुरणेश्वर लक्ष्मण माने |
| ३१ | ६६/१ | ०.३८ | ०.०८ | रामचंद्र महादेव शिंदे |
| ३२ | ६६/२ | ०.४४ | ०.०८ | सदाशिव मारूती माने, सुहास कृष्णा माने, श्रीमंत कृष्णा माने, शंकर कृष्णा माने, चतुरा कृष्णा माने, कोमल श्रीमंत माने, दिपक कृष्णा माने |
| ३३ | ६७/१ | ०.२४ | ०.०२५० | राजेंद्र रामचंद्र माने, संजय नवनाथ माने, स्वाती विक्रम माने, आशा नवनाथ माने, अंजना माणिक निकम, रंजना राजेंद्र गायकवाड, लक्ष्मी रामचंद्र माने |

तरी वर नमूद मिळकतीबबात कोणाचाही कोणताही हक्क/अधिकार असलेस अगर करार, दावा, मदार असलेस पतसंस्था, वित्तीय संस्था, सरकारी कार्यालये व निमसरकारी कार्यालये, आरक्षण असल्यास प्रस्तावित खरेदीस कोणाचाही काही हरकत असल्यास त्या सर्व संस्था आणि व्यक्तींना या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, सदरची नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसांच्या कालावधीत खालील पत्त्यावर त्यांची लेखी हरकत कार्यालयीन वेळेत आवश्यक त्या कागदपत्रांसह समक्ष भेटून सादर करावी. अन्यथा सदरची मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असे समजून व्यवहार पूर्ण करण्यात येईल. तद्नंतर कोणाचीही तक्रार वा हरकत ही ग्राह्य धरली जाणार नाही. सदरची नोटीस ही कोणाचेही नुकसान व फसवणूक होऊ नये म्हणून दिलेली आहे, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

हरकती/आक्षेप पाठविणेचा पत्ता भूसंपादन भवन, सातारा उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. २१ (कृष्णा खोरे) भूसंपादन भवन सातारा.

**दिनांक : ११ /०८/२०२५**
**ठिकाण : सातारा**

**(सही/-)**
**(ॲड. शरद रा. जांभळे)**
**कायदेशीर सल्लागार,**
**उरमोडी धरण विभाग, सातारा**

**(सही/-)**
**(अमर काशीद)**
**कार्यकारी अभियंता,**
**उरमोडी धरण विभाग, सातारा**

**(सही/-)**
**(प्रविण साळुंके)**
**उपजिल्हाधिकारी**
**भूसंपादन क्र. २१ (कृष्णा खोरे) सातारा**

जिमाका/सातारा/जा/१४७/२०२५-२६

# धोम धरणातून पाण्याचा विसर्ग ;कृष्णेला महापूर

**वाई/प्रतिनिधी:-**

गेल्या दोन तीन दिवसात वाई तालुक्यात पावसाने हाहाकार माजवला असून.धोम. धरण पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस पडत आहे धोम-बलकवडी १००% धरलेली आहेत. बलकवडी धरण पूर्ण क्षमतेने ३.६५ टीएमसी म्हणजेच ९८ %टक्के भरले असून बलकवडी धारणा पाठोपाठ धोम धरण १३ टीएमसी म्हणजेच ९७ % टक्के भरले . धोम धरणात जांभळी बंधार्यातून ७.५ हजार क्युसेस पाण्याची आवक होत असल्याने मंगळवारी दुपारी दोन वाजता धोम धरणातून बारा हजार क्युसेस पाण्याचा विसर्ग करण्यात येत असल्याचे धोम पाटबंधारे खात्याकडून जाहीर करण्यात आले.

बलकवडी धरणातून सध्या धरणात तीन हजार क्युसेस पाण्याची आवक होत असून धरण पूर्ण क्षमतेने भरले आहे. धरण परिसरात ७०० मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे, खंडाळा तालुक्याला चारशे क्युसेस पाण्याचा विसर्ग कालव्यातून करण्यात येत आहे. गेल्या दोन दिवसात वाई तालुक्यात प्रंचड प्रमाणात पाऊस पडत असल्याने वाई तालुक्यातील धोम-बलकवडी-नागेवाडी, जांभळी ही धरणे पूर्ण क्षमतेने भरली आहेत. वाईच्या पश्चिम भागातील भात हे मुख्य पिक असून ते समाधानकारक पाऊस पडल्याने बळीराजा आनंद व्यक्त करताना दिसत आहे. तरीही पाऊस न उघडल्यास खरीपच्या कडधान्य उत्पन्नात घट होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. धोम धरणाची पातळी ७४७ मीटर असून १३.३ टीएमसीचे हे धरण आहे, सध्या धरणात १५ हजार क्युसेस पाण्याची आवक असून त्यातून बारा हजार क्युसेस पाण्याच विसर्ग चालू केला आहे. धरणाचे पाच दरवाजे चार फुटांपर्यंत उघडले आहेत. महागणपतीच्या चरणाला महापुराच्या पाण्याने स्पर्श केला आहे. कृष्णा नदीला आलेला महापूर पाहण्यासाठी वाईकर नागरिकांनी चांगलीच गर्दी केली आहे.

महागणपती मंदिरा शेजारचा पूल पाण्याखाली गेला आहे. शेजारच्या झोपडपट्टीत सुध्दा पाणी शिरले आहे. झोपडपट्टीतील नागरिकांची भिरोबा मंदिरात राहण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. वाई शहराची वाहतूक सध्या एकाच पुलावरून होत असून पोलिसांनी महत्वाच्या कामाशिवाय बाहेर न पडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे. एकाच पुलावरून वाहतूक चालू असल्याने वाईकरांना



वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागणार आहे. धोम पाटबंधारे खात्याकडून काठावरील रहिवाशांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. तसेच काठावरील ग्रामीण भाग या शहरातील नागरिकांनी नदी काठावर कपडे धुणे, पाण्यात उतरणे, मासेमारी करणे या सारख्या प्रकारापासून लांब राहण्याची विनंती करण्यात आली आहे. धरण क्षेत्रात मुसळधार पाऊस पडत असून पाऊस न थांबल्यास पाण्याचा विसर्ग वाढविण्यात येणार असल्याचे हि संबधित विभागाने सांगण्यात आले आहे. गेल्या तीन महिन्यांपासून



महागणपती मंदिरातील, गणपतीला पाण्याचा चरण स्पर्श

पावसाने उघडीप न दिल्याने खरीप हंगाम वाया जाण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे ओला दुष्काळ जाहीर करण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.



## आ. गाडगीळ यांच्याकडून सांगलीत पूरस्थितीची पाहणी

**सांगली/प्रतिनिधी:-**

कोयना, चांदोली धरण क्षेत्रात मुसळधार पावसाने कहर केला असून नद्यांना मोठा पूर आला आहे. सांगलीत पुन्हा एकदा महापूराचे संकट घोंगावत आहे. या गंभीर परिस्थितीची पाहणी करण्यासाठी आ. सुधीर गाडगीळ यांनी जिल्हाधिकारी, महापालिका अधिकारी आणि प्रशासकीय यंत्रणेसह पूरग्रस्त भागांना भेट दिली.

आमदार गाडगीळ यांनी आयर्विन पुलाजवळ कृष्णा नदीच्या पाणीपातळीची नावेतून पाहणी केली, तसेच सरकारी घाट, विष्णू घाट, सांगलीवाडी, सूर्यवंशी प्लॉट परिसर आणि हरिपूर कोथळी पुल येथील वारणा-कृष्णा संगमाची थेट पाहणी केली.

आ. गाडगीळ म्हणाले, महापुराचे संकट पुन्हा डोक्यावर आले आहे. आपण सर्वांनी सतर्क राहावे, प्रशासनाला सहकार्य करावे. जिल्हा प्रशासन, महापालिका आणि पोलीस आपल्या मदतीसाठी नेहमी तत्पर आहेत. यावेळी जिल्हाधिकारी अशोक काकडे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त राहुल रोकडे, अपर तहसीलदार अश्विनी वरुटे, सरपंच राजश्रीताई तांबवेकर, अरविंद तांबवेकर, पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# भीमा नदीला पूर ;१ लाख ४६ हजाराचा विसर्ग

**पंढरपूर/यशवंत कुंभार:-**

उजनी व वीर धरणाच्या पाणलोट क्षेत्रामधील सततच्या पावसामुळे धरणाच्या पाणी पातळीमध्ये सातत्याने वाढ होत आहे .धरणाची पाणी पातळी नियंत्रित करण्यासाठी उजनी धरणातून ९१ हजार ६०० क्यूसेक्स तर वीर धरणातून ५४ हजार ७६० क्यूसेक्स असा एकूण १ लाख ४६ हजार ३६० क्यूसेक्स इतका विसर्ग सोडण्यात आल्याने नदीकाठच्या नागरिकांनी सतर्कता बाळगावी, असे आवाहन तहसीलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.

दि.२० ऑगस्ट बुधवार २०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता संगम येथून १ लाख २० हजार ६९५ क्सूसेक्सने पाणी वाहत आहे तर चंद्रभागा नदी पात्रातून ६० हजार २४७ क्सूसेक्सने पाणी वाहत आहे.उजनी व वीर धरण घाटमाथ्यावरील पावसाच्या प्रमाणानुसार व धरणामध्ये येणाऱ्या पाण्याच्या आवक (खपषश्रे) नुसार विसर्गामध्ये अजून वाढ होण्याची शक्यता आहे.त्यानुषंगाने, नदीपात्रालगत पूरस्थिती निर्माण होवून सखल भागातील नागरी वस्तीमध्ये मध्ये पूराचे पाणी शिरण्याची शक्यता आहे. तसेच पाणी पातळी वाढत असल्याने पंढरपूर तालुक्यातील ८ कोल्हापूर पद्धतीचे बंधारे पाण्याखाली



जाण्याची शक्यता असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीने नीरा व भीमा नदी काठच्या नागरिकांनी सतर्कता बाळगावी.

भीमा व नीरा नदीमधून मोठ्या पाण्याचा विसर्ग सुरु झालेला आहे त्यामुळे नदीतील कोल्हापूर पद्धतीचे सर्वच बंधारे पाण्याखाली जाणार आहेत. बंधारे पाण्याखाली गेलेल्यावर बॅरेकेट लावून वाहतुकीसाठी बंद करावेत.अशा सूचना तलाठी, ग्रामसेवक, पोलीस पाटील यांना दिलेल्या आहेत.

उजनी व वीर धरणाची पाणी पातळी नियंत्रित करण्यासाठी भीमा नदीला उजनीतून मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरु झालेला आहे त्यामुळे शहरातील चंद्रभागा नदीकाठच्या भागातील नागरिकांनी सुरक्षेबाबत दक्षता घ्यावी तसेच पूर परिस्थितीत आवश्यक उपाययोजना करण्यासाठी नगरपालिका प्रशासन सज्ज असल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

### पंढरपूर येथील नदीपात्रातील मंदिरे पाण्यात..

भीमा नदीपत्रात वाळवंटातील सर्व मंदिरे पाण्याखाली गेली असून, गोपाळपूर येथील विष्णुपद मंदिर पूर्ण बुडाले आहे. शासनाने पंढरपूरकरांना सावध राहण्याचे आदेश दिले असून, नदीकाठच्या लोकांना इतरत्र राहण्याची प्रशासनाकडून व्यवस्था करण्यात येत आहे. आपत्ती व्यवस्थापन कार्यरत झाले आहे.

# उत्पादन शुल्क भरारी पथकाने सुमारे सव्वा कोटीची दारू पकडली

**सातारा/प्रतिनिधी:-**

राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक सातारा या कार्यालयाने १९ ऑगस्ट रोजी पुणे आशियाई महामार्गावर तासवडे टोलनाक्यावर सापळा रचून महाराष्ट्र राज्यात विक्रीस प्रतिबंधीत व गोवा राज्य निर्मित विदेशी मद्य वाहतुकीवर कारवाई करून आरोपीच्या ताब्यातून १ कोटी २२ लाख ७६ हजार २०० रुपयांचा मुददेमाल जप्त करण्यात आला.

करण्यात आलेल्या कारवाईत गोवा राज्य बनावट विदेशी मध्य रॉयल ब्ल्यू माल्ट व्हिस्की १८० मि.ली क्षमतेच्या ४८९६० बाटल्या (१०२० बॉक्स), आयशर कंपनीचा सहाचाकी ट्रक जिचा क्र. एमएच-४३-बोएक्स-९४०८ व जुना वापरता ओपो कंपनीचा मोबाईल जप्त करण्यात आले या जप्ती मुद्देमालाची एकूण किंमत १ कोटी २२ लाख ७६ हजार २०० रुपये इतकी आहे.

यातील आरोपी आकाश चंद्रकांत घोटकुले वय २९ वर्षे, रा. उसे ता. मावळ जि. पुणे याच्यावर महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ चे कलम ६५ (अ) (ई).९०.१०३.१०८ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, आयुक्त डॉ. राजेश देशमुख, अमंलबजावणी व दक्षता महाराष्ट राज्य सह आयुक्त प्रसाद सुर्वे, राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापुर विभाग विभागीय उप-आयुक्त कोल्हापूर विजय चिचांळकर यांच्या निर्देशानुसार, सातारा राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक बाबासाहेब भुतकर यांचे मार्गदर्शनाखाली निरीक्षक, सातारा येथील राज्य उत्पादन शुल्कचे भरारी पथकाचे निरीक्षक माधव चव्हाण, दुय्यम निरीक्षक अजय पाटील, सहा.दुय्यम.निरीक्षक पांडुरंग कुंभार, जवान राणी काळोखे, मनीष माने, विनोद बनसोडे, अरूण जाधव कारवाईत यांनी भाग घेतला. गुन्ह्याचा पुढील तपास माधव चव्हाण, निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक,



सातारा हे करीत आहेत.

जिल्हयामध्ये बनावट दारु तसेच हातभट्टी दारु निर्मिती, विक्री, वाहतूक तसेच इतर कोणत्याही प्रकारच्या दारुची निर्मिती, विक्री व वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याची माहिती तात्काळ या कार्यालयास देण्यात यावी, असे आवाहन बाबासाहेब भुतकर, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सातारा यांनी केले आहे.

# विट्यात पावसाने घराची भिंत कोसळून लहान मुलांसह चौघे जखमी

**विटा/प्रतिनिधी:-**

सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील खानापूर तालुक्यासह विटा शहरात पावसाने चांगलाच कहर केला आहे. सत्ताधार पावसामुळे हवेत गारवा निर्माण झाला आहे. तर दुसरीकडे या पावसामुळे ओला दुष्काळ अशी परिस्थिती या तालुक्यात झाली आहे. गेले दोन ते तीन दिवस झाले या मुसळधार पावसामुळे विटा शहरात विटा सांगली रोडवरील नेहरूनगर येथे घराची भिंत घुसळून दोन लहान मुलांसह दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत.

सदर आमीन लतिफ हे प्लंबिंग व्यवसाय काम करणारे कुटुंब व त्यांची पत्नी शहराज मुलगा अकबर व अल्ली हे पाऊस पडताना घरामध्ये बसले होते. यावेळी संततधार पावसामुळे घराची भिंत कोसळल्यामुळे या घडलेल्या घटनेत हे चौघेजण गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेनंतर तात्काळ आजूबाजूच्या लोकांनी या चौघांना विटा - सांगली रोड येथील ग्रामीण रुग्णालयात खाजगी वाहनाने उपचारासाठी दाखल केले. या घडलेल्या घटनेत कोणतीही जीवित हानी



झाली नाही.

एवढी मोठी दुर्घटना होऊन ही या घटनेतून हे सारे जण बचावले आहेत. म्हणतात ना देव तारी त्याला कोण मारी ! ही घटना सदर नेहरूनगर सकट बिल्डिंगच्या पाठीमागे दुपारी चार वाजण्याच्या सुमारास घडली. सदर हे घर कौलारू व जुन्या पद्धतीचे असल्याचेही माहिती घटनास्थळी नागरिकांनी दिली.

# जिल्हा परिषदेचा कनिष्ठ अभियंता लाच लुचपतच्या जाळ्यात

## कराड येथे बांधकाम विभागाच्या कार्यालयात कारवाई

**कराड/प्रतिनिधी:-**

सातारा जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता प्रशांत बावधनकर वय ४५ वर्ग ३ राहणार सहकारी गृहनिर्माण संस्था सोनगाव सातारा यांना २४ हजार रुपयांची लाच घेताना लाच लुचपत प्रतिबंधक विभाग सातारा विभागाने सापळा रचून पकडले .कॉलिटी कंट्रोल रिपोर्ट देण्यासाठी चार हजार रुपये आणि इस्टिमेटच्या पाच टक्के असे २४ हजाराची लाच घेताना त्यांना पकडण्यात आले आहे.

बुधवारी दुपारी ही कारवाई करण्यात आली .तक्रारदार हे जिल्हा परिषद सातारा बांधकाम विभागांमध्ये सुशिक्षित बेरोजगार अभियंता व कंत्राटदार स्थापत्य विभागाचे परवाना प्राप्त कंत्राटदार आहेत .त्यांना मौजे पार्ले तालुका कराड येथील रस्त्याचे कॉंक्रीट करण्याचे काम २०२४ मध्ये मिळाले होते .कंत्राटदारांनी वर्क ऑर्डर प्रमाणे हे काम पूर्ण केले कामाचे मोजमाप करून बिल काढण्यासाठी त्यांनी आरोपी लोकसेवक प्रशांत बावधनकर यांच्या कार्यालयात भेट घेतली बावधनकर यांनी वर्क ऑर्डर चे काम आणि त्याचा कॉलिटी कंट्रोल रिपोर्ट यासाठी २४ हजार रुपयांची मागणी केली यामध्ये २० हजार



रुपये इस्टिमेटचे आणि चार हजार रुपये व्यक्तिगत असे २४ हजार रुपये ची मागणी केली होती.

तक्रारदारांनी याबाबत सातारा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली .लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलिस निरीक्षक सुप्रिया गावडे गणेश ताटे निलेश राजपुरे निलेश चव्हाण अजयराव देशमुख राजेंद्र निकम यांनी जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या कार्यालयात सापळा रचला आणि पंचांसमक्ष २४ हजार रुपयाची लाज घेताना रंगेहाथ पकडले त्यांच्या विरोधात कराड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

# संभाव्य पूरस्थितीसंदर्भात प्रशासन सज्ज

## आ.अतुल भोसले,प्रशासकीय आढाव बैठक,नागरिकांना कोणताही त्रास होऊ देणार नाही

**कराड/प्रतिनिधी:-**

कोयना धरणातून नदीपात्रात सुमारे एक लाख क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू केल्याने, कराडला संभाव्य पूरस्थिती निर्माण झाली आहे. पूरग्रस्त भागातील नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्याची व्यवस्था केली आहे. प्रशासनाने शाळांनाही सुट्टी जाहीर केली असून, आरोग्य यंत्रनाही क्शन मोडवर ठेवली आहे. त्यामुळे संभाव्य पूर परिस्थितीसाठी प्रशासन सज्ज असून, नागरिकांना कोणताही धोका पोहोचणार नाही, याची तरतूद करण्यात आली असल्याची माहिती आमदार डॉ. अतुल भोसले यांनी दिली.

येथील शासकीय विश्रामगृहात बुधवारी संभाव्य पूर परिस्थितीसंदर्भात आमदार डॉ. अतुल भोसले यांनी प्रशासनाच्या सर्व विभागांची आढाव बैठक घेतली. बैठकीस प्रांताधिकारी अतुल म्हेत्रे, तहसीलदार कल्पना ढवळे,



कराड नगरपालिकेचे मुख्याधिकारी प्रशांत भटकर, मलकापूर पालिकेचे मुख्याधिकारी प्रताप कोळी, तसेच आरोग्य व महसूल विभागासह अन्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते. या बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना आमदार भोसले बोलत होते.

आ. भोसले म्हणाले, कराडला पूर परिस्थितीचा धोका लक्षात घेऊन प्रशासनास आवश्यक त्या सूचना केले आहेत. तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी काही सूचना माझ्याकडे मांडल्या होत्या, त्या अनुषंगानेही प्रशासनास सूचित करण्यात आले आहे. प्रशासनातील विविध विभागांनुसार काय समस्या आहेत आणि त्यावर काय उपाययोजना करणे गरजेचे आहे, याची माहिती घेतली आहे. त्या त्या ठिकाणी पूर परिस्थितीचा धोका अधिक आहे, त्या ठिकाणी काय उपाययोजना केल्या पाहिजेत, पूरग्रस्त भागातील लोकांचे पुनर्वसन कोठे केले पाहिजे, पाणी पातळीत किती वाढ झाल्यावर तात्काळ स्थलांतर केले.

### २२ कुटुंबांचे स्थलांतर

दोन दिवसांपासून सुरु असलेल्या पावसाच्या संततधारेमुळे नद्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. त्यात कोयना धरणातून मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरु केल्याने कराडला पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. या दृष्टीने पूरबाधित भागातील २२ कुटुंबांचे तात्पुरते स्थलांतर करण्यात आले आहे. यातील ११ कुटुंबे नगरपालिकेच्या शाळा क्रमांक ३ मध्ये, तर अन्य ११ कुटुंबांना पत्रा चाळीत स्थलांतरित करण्यात आल्याची माहिती प्रशासनाच्या वतीने देण्यात आली.

# श्री क्षेत्र नृसिंहवाडीतील संपूर्ण श्री दत्त मंदिर पुराच्या पाण्याखाली



**शिरोळ/प्रतिनिधी:-**

शिरोळ तालुक्यासह राधानगरी कोयना धरण पाणलोट क्षेत्रात पडलेल्या पावसामुळे कृष्णा पंचगंगेची पाण्याची पातळी वाढल्याने श्री क्षेत्र नृसिंहवाडी येथील दत्त मंदिर पाण्याखाली गेले आहे तसेच तालुक्यातील चारही बंधारे पाण्याखाली गेले असून शिरढोण,औरवाड जुना पूल पाण्याखाली गेले असून तालुक्यातील अनेक गावचा संपर्क तुटला असून दोन मार्ग बंद वाहतूकीस बंद झाले आहेत

गेल्या चोवीस तासात कोयना राधानगरी धरण पाणलोट क्षेत्रासह शिरोळ तालुक्यात पडलेल्या मुसळधार पावसामुळे तालुक्यातील कृष्णा पंचगंगा नद्यांच्या पाण्याच्या पातळीत मोठी वाढ झाली आहे यामुळे श्री क्षेत्र नृसिंहवाडी येथील दत्त मंदिर पूर्ण पाण्याखाली गेले आहे श्रींची उत्सवमूर्ती भक्तांच्या दर्शनासाठी मुख्य मंदिराच्या वरील बाजूस असणाऱ्या नारायण स्वामी मंदिरात ठेवण्यात आली आहे येथेच सर्व पूजा अभिषेक नित्यक्रम सुरू आहेत पाण्याची पातळी झपाट्याने वाढल्याने शिरोळ तालुक्यातील शिरोळ ,तेरवाड राजापूर, बंधारे पाण्याखाली गेले आहेत तर जुना कुरुंदवाड शिरोळ तसेच कुरुंदवाड शिरढोण मार्ग वाहतुकीस बंद झाला

## कृष्णा,पंचगंगेच्या पाणी पातळी सात फुटाने वाढ

आहे आज, बुधवार सकाळपासून पावसाने उघडीप दिली असली तरी कोयना, राधानगरी धरणातून विसर्ग सुरु असल्याने नद्यांच्या पाणी पातळीत वाढ होत आहे.राधानगरीचे स्वयंचलित दरवाजे खुले होण्याची शक्यता आहे यामुळे पंचगंगेच्या पातळी आणखी वाढण्याची शक्यता असून महापुराचा धोका संभवत आहे नदीकाठच्या अनेक घरांमध्ये पुराचे पाणी शिरले आहे यामुळे तेथील नागरिक सुरक्षित स्थळी स्थलांतरित होत आहेत कृष्णा, पंचगंगेचे पाणी पात्राबाहेर गेल्याने मंदिरासह शेती पाण्याखाली गेली आहे. अनेक मार्गावरील वाहतूक बंद झाली आहे. दत्त मंदिर पूर्णपणे पाण्याखाली गेल्याने दत्त देवस्थानमार्फत मंदिर परिसरातील सर्व साहित्य सुरक्षित ठिकाणी हलविण्यात येत आहे. मंदिर परिसरातील वेदमूर्ती भैरंभट जेरे पुजारी प्रसादालय, धार्मिक विधी हॉल, दशक्रिया विधी हॉल या ठिकाणी कृष्णा व पंचगंगा नदीचे पाणी आले आहे.

नृसिंहवाडी गावच्या तिन्ही बाजूंनी नदी असल्याने पुराच्या पाण्याने नृसिंहवाडीला वेढा घालण्यास सुरुवात झाली आहे नृसिंहवाडी येथील येथील बाबर प्लॉटमधील रामनगर येथील काही भागात पाणी जाऊ लागल्याने येथील लोक स्थलांतराच्या तयारीत आहेत तसेच करूंदवाड भैरववाडी पुला नजीकच्या जनावरांच्या गोठ्यात आणि कांहीं घरात पुराचे पाणी शिरल्यामूळे येथील नागरीक स्थलांतर झाले आहेत